कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. १ ऑगस्ट २०२५
किंमत ४ ₹

## शहिद निलेश तुणतुणे यांचा स्मृतिदिन

अलिबाग : कारगिल युध्दात निलेश तुणतुणे शहिद झाले. त्यांचा २७ वा स्मृतिदिन शुक्रवारी (दि.१) सहाणगोठी येथे आयोजित करण्यात आला आहे. शहिद निलेश तुणतुणे ट्रस्ट व पंचायत समिती अलिबाग यांच्या संयुक्त विदयमाने हा समारंभ होणार आहे. यावेळी पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, पोलीस निरीक्षक किशोर साळे, निवृत्त लष्कर अधिकारी कॅप्टन उमेश वाणी, निवृत्त लष्कर अधिकारी कर्नल एन.डी. जानकर, माजी सैनिक अमरनाथ राणे, पान २ वर

HIRING ALERT
Looking For South Indian Cook
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

### स्मार्ट मीटरविरोधात महावितरण कार्यालयावर

# शेकापचा हल्लाबोल

**कार्यवाही करण्याचे महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांचे लेखी उत्तर**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

**रायगडसह अलिबाग व परिसरात कोणतीही परवानगी न घेता स्मार्ट मीटर बसविले जात आहेत. स्मार्ट मीटरमुळे वीज बील भरमसाठ येऊ लागले आहेत. या विरोधात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने अलिबागमधील चेंढरे येथील महावितरण कंपनीच्या कार्यालयावर हल्लाबोल केला. मीटर बसविणे बंद करा, भरमसाठ बील आलेले रद्द करा, अशा अनेक मागण्यांसाठी हा लढा पुकारण्यात आला. अखेर महावितरण विभागाचे अधिकारी या लढ्यासमोर नमले. त्यांनी आठ दिवसांत सकारात्मक कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन थांबविण्यात आले.**


(छायाचित्र : समीर मालोदे)

शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी भवन ते चेंढरे येथील महावितरण कंपनी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. हातात लाल झेंडा घेत असंख्य कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले होते. बंद करा, बंद करा स्मार्ट मीटर सक्ती बंद करा, सर्वसामान्यांवर होणारा अन्याय सहन करणार नाही, अशा घोषणा देत सरकार व महावितरण कंपनीविरोधात एल्गार पुकारण्यात आला. चेंढरे येथील महावितरण कंपनीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता तायडे यांच्या कार्यालयात धडक मोर्चा नेला. सक्तीने बसवत असलेल्या स्मार्ट मीटरबाबत शेकापच्या संतप्त कार्यकर्त्यांनी जाब विचारला. कार्यकारी अभियंता जागेवर नसल्याने कार्यकर्त्यांचा संताप वाढला. न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच ठेवणार, जोपर्यंत लेखी उत्तर देत नाही, पान २ वर

### मीटर लावण्याबाबत महावितरण अधिकारी अनभिज्ञ

अलिबाग शहरासह ग्रामीण भागात ठिकठिकाणी महावितरण कंपनीमार्फत स्मार्ट मीटर बसविले जात आहे. महावितरण कंपनीचे कर्मचारी घरोघरी जाऊन मीटर बसवित आहेत. मीटर का बसविले जात आहे, असा सवाल ॲड. मानसी म्हात्रे यांनी कार्यकारी अभियंता शैलेश कुमार यांना विचारला. त्यामुळे आम्ही मीटर बसवत नाही, असे सांगून आपल्याकडील जबाबदारी ढकल्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांनी केले. त्यामुळे मीटर लावले जात असताना अधिकारी अनभिज्ञ असल्याचे यावरुन स्पष्ट झाले.

### मनमानी कारभाराबाबत तीव्र नाराजी

स्मार्ट मीटर बसविण्याचे काम चालू आहे. त्याविरोधात शेकापच्या वतीने महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता शैलेश कुमार यांना पत्र दिले होते. त्यावेळी ३१ जुलैला कार्यालयात येणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र शैलेश कुमार गुरुवारी कार्यालयात नसल्याने कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. अतिमहत्वाच्या कामात असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे शैलेश कुमार यांच्या मनमानी कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

# उद्या शेकापचा भव्य मेळावा

**शेकापच्या वर्धापन दिनानिमित्त तयारी जोरात**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाचा ७८ वा वर्धापन दिन शनिवारी होणार (दि.२) आहे. रायगड जिल्ह्यातील नवीन पनवेलमधील पोलीस मैदानात सदस्यांचा भव्य मेळावा आयोजित केला आहे. त्याची तयारी जोरात सुरू आहे. २५ हजारहून अधिक कार्यकर्ते या मेळाव्यात सहभागी होणार असल्याची माहिती शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी दिली.

शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मेळाव्यामध्ये मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेसचे आ. विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व शिवसेना उद्धव ठाकरे पान २ वर

### २५ हजार कार्यकर्ते सहभागी होणार

**अलिबाग :** शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन यंदा पनवेलमध्ये होणार आहे. या सोहळ्यात जिल्ह्यातून २५ हजार अलिबागमधून ५ हजार कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. अलिबाग तालुक्यातही मेळाव्याची जोरदार तयारी करण्यात आली आहे. शेकापच्या वर्धापन दिनानिमित्त ग्रामपंचायत स्तरावर बैठका घेण्यात आल्या. गावोगावी जाऊन कार्यकर्त्यांना भेटून त्यांच्याशी संवाद साधला. वर्धापन दिनाला येण्याची तयारी जोरात झाली आहे. तरुण कार्यकर्त्यांसह महिला, वयोवृध्द कार्यकर्ते या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. वर्धापनदिनाला जाण्याची तयारी पूर्ण झाली आहे. प्रत्येक गाडीवर लाल बावटा असणार आहे. काहीजण दुचाकीवरून तर काहीजण तीन चाकी, चारचाकी गाडीने जाणार आहेत. काहीजण बसमार्फत या मेळाव्यापर्यंत पोहचणार आहेत. त्यामुळे एक वेगळा उत्साह कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला आहे. सकाळी सात वाजल्यापासून कार्यकर्ते मेळाव्याला निघणार असल्याची, माहिती शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी दिली.

### कृषी अभ्यासक्रमासाठी
## २२ हजार अर्ज

। मुंबई । वृत्तसंस्था ।

कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी २७ जुलैपर्यंत मुदतवाढ दिल्यानंतर या अभ्यासक्रमाच्या नऊ विषयासाठी राज्यभरातून २२ हजार ६८५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. कृषी अभ्यासक्रमाची अंतरिम गुणवत्ता यादी ३१ जुलै रोजी जाहीर करण्यात आली. कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या बी.एस्सी ॲग्रीकल्चर, बी.एस्सी (हॉर्टिकल्चर),बी.एस्सी(फॉरेस्ट्री), बी.एफ.एस्सी (फिशरी), बी.टेक (फूड टेक्नोलॉजी), बी.टेक (बायो टेक्नोलॉजी), बी.टेक (ॲमग्रीकल्चर पान २ वर

### मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील
# आरोपींची निर्दोष सुटका

- **साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, पुरोहितसह सातजणांची पुराव्यांअभावी निर्दोष सुटका**
- **१७ वर्षांनी विशेष न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल, आरोप सिद्ध करण्यात सरकारी तपास यंत्रणा अपयशी**

। मालेगाव । प्रतिनिधी ।

मालेगाव येथे २९ सप्टेंबर २००८मध्येझालेल्याबॉम्बस्फोटांशी संबंधित बहुप्रतिक्षित खटल्याचा राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कायद्यांतर्गत स्थापन विशेष न्यायालय गुरूवारी निकाल दिला.

हा निकाल देताना विशेष न्यायालयाचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांची पुराव्याअभावी सुटका केली.बॉम्बस्फोट झाला, मात्र मोटारसायकलमध्ये झाला हे सिद्ध करण्यात सरकारी पक्षाला पान २ वर

**वे|ध|क**

### दोन अल्पवयीन मुलांसमवेत आई बेपत्ता

**कोलाड :** पुगाव आदिवासीवाडी येथून राहत्या घरातून दोन अल्पवयीन मुलांसमवेत आई बेपत्ता झाल्याची घटना घडली. कोलाड पोलिसात फिर्यादी संदीप वाघमारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अनिता संदीप वाघमारे, क्षुतिका वाघमारे, सूरज वाघमारे हे पुगाव आदिवासी वाडी येथे राहत असून ८ जून रोजी पती संदीप वाघमारे घरी नसताना, पत्नी अनिता वाघमारे कुणालाही न सांगता आपल्या दोन मुलांना सोबत घेऊन घरातून निघून गेली. कोलाड पोलिसात या घटनेची नोंद करण्यात आली असून या घटनेचा तपास कोलाड सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार श्रीधर अधिकारी करीत आहेत. परिसरात महिला व दोन अल्पवयीन मुले कुणाला आढळून आल्यास संपर्क साधण्याचे आवाहन कोलाड पोलिसांनी केले आहे.

### अधिकाऱ्यांची गाडी अडवल्याप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** गटविकास अधिकाऱ्यांचे शासकीय वाहन अडवून ठेवल्याप्रकरणी १६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिखले ग्रामपंचायतच्या सरपंच दिपाली तांडेल, त्यांचे पती दत्तात्रय तांडेल हे स्वतःच्या घरात कोंडून घेऊन औषध पिऊन देहत्याग करणार होते. त्यानुसार त्या ठिकाणी बंदोबस्त नेमण्यात आला होता. त्यांचे मत परिवर्तन करण्यासाठी गटविकास अधिकारी चिखले गावात गेले होते. यावेळी दिपाली आणि दत्तात्रय तांडेल यांनी विषारी औषध प्यायल्याने पोलिसांनी दरवाजा तोडून त्यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे पाठवून दिले. गटविकास अधिकारी बोलेरोतून जात असताना ग्रामस्थांनी त्यांचे वाहन रस्त्यात अडवले आणि संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांना अटक करा, अशी मागणी केली.

# सायबर फसवणुकीचा पर्दाफाश



- **उत्तरप्रदेश, नेपाळच्या आंतराष्ट्रीय टोळीला अटक**
- **अलिबागमधील डिजिटल अटकेचा गुन्हा उघड**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

टेलिकॉम ॲथोरेटी ऑफ इंडियाच्या नावाने संपर्क साधून अलिबागमधील एका वयोवृध्दाला ६६ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला होता. रायगड पोलिसांनी या सायबर फसवणुकीचा पर्दाफाश केला. नेपाळसह उत्तरप्रदेशमधील आंतरराष्ट्रीय टोळीला गजाआड करण्यात आले असून बीएसएनएल, जिओ( रिलायन्स), टाटा टोकोमो अशा विविध कंपन्यांचे सहा हजार १७५ सीमकार्ड जप्त केले आहेत. अकरा जणांना ताब्यात घेण्यात आले असून यातील दोघेजण जिओ सेल एक्झिक्युटिव्ह असल्याची माहिती पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिली.

आंचल दलाल यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, ५ मे २०२५ रोजी अलिबागमधील एका वयोवृध्द व्यक्तीशी अज्ञात व्यक्तीने लँड लाईनवरून संपर्क साधला. टेलिकॉम ॲथोरेटी ऑफ इंडियामधून बोलत असल्याचे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. मोबाईल नंबर बंद होणार असल्याचे सांगण्यात आले. ही सेवा सुरु करण्यासाठी नऊ नंबर डायल करण्यास सांगितले. त्या व्यक्तीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून वयोवृध्द पान २ वर

### एक ऑगस्टपासून महसूल सप्ताह

। रायगड । प्रतिनिधी ।

महसूल विभागाच्या वतीने राज्यात एक ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा सप्ताह शुक्रवार (दि.१) ते गुरुवार (दि.७) दरम्यान असणार आहे. या सप्ताह अंतर्गत विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

१ ऑगस्ट रोजी महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आणि निवृत्त महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार होईल. याच दिवशी विविध प्रमाणपत्रांचे वाटपही मान्यवरांच्या हस्ते केले जाईल. २ ऑगस्ट रोजी अतिक्रमण नियमानुकूल केले जाणार आहे. ३१ डिसेंबर २०११ पूर्वी शासकीय पान २ वर

Shree Gopinath Mahadev Vedak Pratisthan's
G.M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY,TALA
APPROVED BY AICTE & DTE GOVT. OF MAHARASHTRA & AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI

CIVIL ENGINEERING
COMPUTER ENGINEERING
MECHANICAL ENGINEERING
ADMISSION OPEN
FIRST YEAR & DIRECT SECOND YEAR
ACCREDITED WITH GRADE B NAAC
Institute Code : 3447
www.gmvit.com
principal@gmvit.com
Dr. Dilip N. Jaiswal, Principal, 9022802204
Prof. S.N. Jadhav, Admission Incharge, 9022938458
Prof. K.P. Risbud, Asst. Admission Incharge, 8087898571
Prof. Jitesh Bhagat, Asst. Admission Incharge, 9021663422
At. Post & Taluka : Tala, Dist - Raigad, Maharashtra - 402111



# कंत्राटी कामगाराने केली बोगस व्हीआयपी पासची विक्री

## खालापूर पोलिसांनी आरोपीला केले गजाआड

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यात जणू काही झटपट पैसा कमविण्याची शर्यतच सुरू आहे, की काय अशीच चर्चा सर्वत्र सुरू झाली आहे. एका पाठोपाठ एक घटना समोर येत असून गोदरेज कंपनीच्या प्रकरणानंतर आता आयआरबी कंपनीमध्ये असणाऱ्या कंत्राटी कामगाराने आयआरबी कंपनीचा फ्री टोल करण्यासाठी आयआरबी रोड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा व्हीआयपी पासेस विक्री केल्याचे समोर आले आहे.

याबाबत आयआरबी कंपनीच्या वतीने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती. याबाबत जाबजबाबानंतर पोलीस अधीक्षक रायगड आँचल दलाल यांच्या आदेशानुसार खालापूर पोलिसांनी या आरोपीवर गुन्हा दाखल करून आरोपीला बेड्या ठोकल्या असून त्याला न्यायालयात हजर केले आहे. खालापूर न्यायालयाने अधिक तपासासाठी २ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

खालापूर तालुक्यात सावरोली गावाजवळ खालापूर टोल नाका आहे. याठिकाणी स्थानिक कामगारांना सुरक्षारक्षक म्हणून नोकऱ्या दिल्या आहेत. यात सावरोली गावातील ओंकार महाडिक हा आपल्या वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या जागी घराचा उदरनिर्वाहच्या दृष्टीने आयआरबी कंपनीने ठेकेदारी पध्दतीवर सुरक्षारक्षक म्हणून कामावर रुजू केला होता. नोकरी करीत असताना या टोल नाक्यावरून ये-जा करणाऱ्या रायगडसह पुणे, मुंबई, ठाणे येथील बड्या वाहनांच्या मालकांशी व तालुक्यातील कार्यकर्ते यासह नेत्यांशी ओळख वाढल्याने त्याने झटपट श्रीमंतीची हवा डोक्यात गेल्याने पैसे कमविण्यासाठी शकल लढवली. आयआरबी रोड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा टोल फ्रीसाठी बोगस व्हीआयपी पास तयार करून मोठा आर्थिक व्यवहार करून अनेकांना विक्री केले आणि ते व्हीआयपी कार्ड अनेक टोल नाक्यावर दाखवून पैसे न देता प्रवास सुरू असल्याचे आयआरबी कंपनीच्या अधिकारी जयवंत देसले यांच्या लक्षात आल्याने याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. खालापूर पोलिसांनी दोन वेळा आरोपीचा जबाब नोंदविला, मात्र चौकशीच सुरू असताना नव्याने रायगड जिल्ह्याचा पदभार घेणाऱ्या रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी याबाबत माहिती घेऊन तात्काळ खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना आरोपी ताब्यात घेऊन गुन्हा नोंद करून अटक करण्याचे आदेश दिल्याने ओंकार महाडिक याला गजाआड केले असून न्यायालयात हजर केले असता २ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

पान १ वरून

## शेकापचा हल्लाबोल

तोपर्यंत ठिय्या आंदोलन करणार असा इशारा ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिला. अखेर कार्यालयात ठिया आंदोलन करण्यात आले.

सक्तीने बसविण्यात आलेले मीटर व भरमसाठ आलेले वाढीव वीजबील तात्काळ रद्द करा, खासगीकरणाचे पाऊल थांबवा, सर्वसामान्यांची होणारी आर्थिक पिळवणूक खपवून घेणार नाही, अशी सक्त ताकीद यावेळी अधिक्षक अभियंता धनराज बिक्कड यांना देण्यात आली. दिलेल्या निवेदनाची कार्यवाही करण्याबाबत लेखी उत्तर देण्याची मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. मात्र अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचे लक्षात आल्यावर शेकाप स्टाईलने त्यांना धारेवर धरण्यात आले.

शेकापच्या आक्रमक भूमिकेनंतर प्रशासन खडबडून जागे झाले. महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांची धावाधाव सुरु झाली. अखेर महावितरण कंपनीचे अधिकारी शेकापच्या आंदोलनासमोर नमले. शेकापच्या लेखी निवेदनाची दखल तात्काळ घेण्यात आली. वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन सक्तीचे स्मार्ट मीटर न लावणे, लावलेले मीटर काढणे, वाढीव बिले रद्द करण्याबाबतची मागणी निवेदनद्वारे करण्यात आली. या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी वरिष्ठ कार्यालय अलिबाग विभाग यांच्याकडे निवेदन पाठवित असून येत्या आठ दिवसामध्ये सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन अतिरिक्त कार्यकारी अभियंता तायडे यांनी दिले. या आश्वासनानंतर ठिय्या आंदोलन थांबविण्यात आले.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी शेकाप राज्य कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, शेकाप माजी तालुका चिटणीस अनिल पाटील, वेश्वीचे माजी सरपंच प्रफुल्ल पाटील, सतिश प्रधान, निखील पाटील, अनिल चोपडा, ॲड. निलम हजारे, नागेश कुलकर्णी, सुरेश पाटील, अशोक प्रधान, नागेश्वरी हेमाडे, प्रमोद घासे असे असंख्य विविध आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला, तरुण, तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्या शेकापचा भव्य मेळावा

पक्षाचे नेते खा. संजय राऊत, आणि शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकनाथ नाईक, प्रा. एस.व्ही. जाधव, शेकाप कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, खजिनदार अतुल म्हात्रे, माजी आ. बाळाराम पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शंकरराव म्हसकर, पनवेलचे माजी पंचायत सभापती काशीनाथ पाटील, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समितीचे माजी पदाधिकारी, सदस्य, ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रातील पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

पनवेल येथे होणाऱ्या वर्धापन दिनाची तयारी गेल्या महिन्याभरापासून सुरु आहे. मंडपापासून पार्कींग व्यवस्था, आसन व्यवस्था अशी सर्वच तयारी करण्यात आली आहे. शेकापच्या वर्धापन दिनामुळे कार्यकर्त्यांमध्ये एक वेगळा उत्साह निर्माण झाला आहे. हजारोच्या संख्येने कार्यकर्ते या मेळाव्यात सामिल होणार आहेत. तालुका स्तरावरील पदाधिकारी गावोगावी, खेड्यापाड्यात जाऊन कार्यकर्त्यांना भेटले. महिला,तरुण वर्गांसह ज्येष्ठ कार्यकर्त्यांकडून या बैठकांच्या माध्यमातून चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे अनेक कार्यकर्ते, तरुण, तरुणी, कार्यकर्ते आदींनी वर्धापन दिनाला येण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. नाक्या-नाक्यावर लाल बावटे व स्वागताचे फलक लावण्यात आले आहेत. वर्धापन दिनाच्या निमित्ताने कार्यकर्त्यांना एक वेगळी उर्जा मिळणार आहे. मेळाव्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी केले आहे.

## शहिद निलेश तुणतुणे यांचा स्मृतिदिन

अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती अनिल पाटील, आदिवासी समाज कायदेशीर सल्लागार ॲड. के.डी. पाटील, शहिद निलेश तुणतुणे ट्रस्टचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास शहिद निलेश तुणतुणे यांच्या पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण केले जाणार आहे. यावेळी पोलीस दलाकडून सलामी देण्यात येणार आहे. रायगड जिल्हा परिषद झिराड प्राथमिक शाळा व चोंढी-किहीम येथील स. म. वडके हायस्कूलमधील विद्यार्थ्यांमार्फत सलामी देण्यात येणार आहे. रायगड जिल्हा परिषद खानाव व बामणगाव हायस्कूलमधील मधील विद्यार्थ्यांकडून लेझीम व कलापथकामार्फत कार्यक्रम होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## कृषी अभ्यासक्रमासाठी २२ हजार अर्ज

इंजिनियरिंग), बी.एस्सी कम्युनिटी सायन्स, बी.एस्सी ॲग्री बिझिनेस मॅनेजमेंट या कृषी अभ्यासक्रमांतर्गत येणाऱ्या नऊ शाखांसाठी २७ जुलैपर्यंत २७ हजार ५७१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यातील २२ हजार ६८५ विद्यार्थ्यांनी शुल्क भरून अर्ज निश्चित केला आहे.

कृषी अभ्यासक्रमासाठी राज्यामध्ये १९८ महाविद्यालयांमध्ये १७ हजार ७९६ जागा आहेत. त्यात ४७ शासकीय महाविद्यालये असून ३ हजार ६२६ जागा तर १५१ विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये १४ हजार १७० जागा आहेत. कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची अंतरिम यादी ३१ जुलै रोजी जाहीर होणार असून अंतिम गुणवत्ता यादी ५ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी व संलग्न या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इयत्ता बारावीला विज्ञान शाखेतून ५० टक्के गुण असलेली अट शिथिल करण्याचा निर्णय राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार खुल्या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्याला बारावीला ४५ टक्के गुण मिळाले आहेत त्यांना प्रवेशाची संधी मिळणार आहे. याचा लाभ फक्त ५३ विद्यार्थ्यांना झाला आहे. मात्र हा नियम फार उशिरा लागू करण्यात आल्याने त्याचा लाभ कमी विद्यार्थ्यांनी घेतला असला तरी पुढील वर्षी या नियमामुळे विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## सायबर फसवणुकीचा पर्दाफाश

व्यक्तीने नऊ नंबर डायल केला. त्यानंतर थोड्यावेळाने एका मोबाईलवरून त्यांना पुन्हा व्हीडिओ कॉल करण्यात आला. मनीलॉँड्रीगचा आरोप करून गुन्हा दाखल करण्याची भिती त्यांना दाखविली. गेले अनेक दिवस हा प्रकार सुरु होता. यातून सुटका हवी असल्यास वेळोवेळी वेगवेगळ्या बँकातील खात्यामध्ये पैसे जमा करण्यास भाग पाडले. टेलिकॉमचा वापर करूनएकूण ६६ लाख रुपयांचा गंडा वयोवृध्दाला घातला होता. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या घटनेचे गांभीर्य ओळखून गुन्ह्याचा तपास करण्यात आला. सायबर गुन्हे शाखेच्या मदतीने शोध मोहिम सुरू करण्यात आली. ऑनलाईन पध्दतीने लंपास करण्यातआलेली रक्कम ए. एच. अगोर वुड ऑईल इंडस्ट्रीचे संचालक अब्दूस सलाम बारभुयान यांच्या खात्यात जमा झाल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे तपासाला अधिक गती देण्यात आली. अखेर अब्दूसला आसाममधून अटक करण्यात आली. त्यानंतर नदीम अहमद, लैराव खान, शादान खान, मोहम्मद खान यांना ताब्यात घेण्यात आले. हे चौघेजण जिओ सेल एक्झिक्युटिव्ह विनयकुमार राव, गंगाधर मुत्तान यांच्याशी संगमनत करून बनावट केवायसी कागदपत्रे बनवित होते.

### ८६ हजार जणांना फसवणुकीसाठी कॉल

आरोपी आदित्य उर्फ अभय मिश्रा हा एसआयपी लाईन कनेक्शनसाठी एग्रीगेटर म्हणून काम करीत होता. हा पाच सर्व्हर चालवित होता. २८ दिवसांमध्ये एसएमएसद्वारे एका सर्व्हरमधून ६२ लाख ९२ हजार कॉल करण्यात आले. त्यापैकी २३ लाख ३३ हजार नागरिकांना प्रत्यक्षात कॉल केले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील ८६ हजार ९१० जणांना फसवणुकीसाठी कॉल केले आहेत. त्याला उत्तरप्रदेशमधून अटक केली.

## आरोपींची निर्दोष सुटका

अपयश आले. आरडीएक्स प्रसाद पुरोहितने आणले हे सिद्ध होऊ शकलेले नाही. त्याच्याविरुद्धचे आरोप सिद्ध झाले नाहीत. ज्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाला त्या ठिकाणाहून वैज्ञानिक पुरावे जमा केले गेले नाहीत. साध्वीच्या मोटारसायकलचा स्फोट झाल्याचा आरोप आहे. पण ही मोटारसायकल तिच्या मालकीची असल्याचे सिद्ध करण्यात अपयश आल्याचे न्यायालयाने आरोपींची सुटका करताना स्पष्ट केले.

प्रदीर्घ काळानंतर ऑक्टोबर २०१८ मध्ये विशेष एनआयए न्यायालयाने आरोपींवर दहशतवादाच्या आरोपांतर्गत आरोपनिश्चिती केली आणि खटल्याच्या नियमित सुनावणीला अखेर सुरुवात झाली. सात वर्षांच्या सुनावणीनंतर १९ एप्रिल २०२५ रोजी फिर्यादी आणि आरोपींचा युक्तिवाद पूर्ण झाल्याचे जाहीर करून खटल्याचा निर्णय राखून ठेवला होता. या प्रकरणी विशेष न्यायालयाने गुरूवारी उपरोक्त निकाल दिला. खटला सुरू असताना प्रकरणातील सगळ्या आरोपींना उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. त्यामुळे, सगळे आरोपी जामिनावर बाहेर होते.

देशातील दहशतवादाशी संबंधित दीर्घकाळ चाललेल्या खटल्यांपैकी हा एक खटला आहे. विशेष न्यायालयाने साध्वी प्रज्ञासिंह आणि पुरोहित यांच्यासह प्रकरणातील शकत आरोपींवर बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायदा, भारतीय दंड विधान आणि शस्त्रास्त्र कायदा अशा महत्त्वाच्या कायद्यांतर्गत दहशतवादाच्या आरोपाप्रकरणी खटला चालवला. खटल्यात एनआयएतर्फे ३२३ साक्षीदारांचे साक्षीपुरावे नोंदवण्यात आले, तर आरोपपत्रात उल्लेख असलेल्या जवळपास ३० हून अधिक साक्षीदारांची साक्ष देण्यापूर्वीच मृत्यू झाला. याशिवाय, त्यापैकी ३४ साक्षीदार फितूर झाले. हे साक्षीदार पुरोहित आणि कथित कट रचण्याच्या बैठकांशी संबंधित होते. तथापि, बॉम्बस्फोटांचा कट रचण्याबद्दल आरोपींनी केलेल्या कोणत्याही चर्चेत आपण सहभागी झाल्याचे किंवा ही चर्चा ऐकल्याचे या साक्षीदारांनी नाकारले. प्रकरणाचा सुरुवातीचा तपास करणाऱ्या राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) जबरदस्तीने, बेकायदेशीररित्या आपल्याला ताब्यात घेतले आणि काही व्यक्तींची नावे सांगण्यास, खोटे विधान करण्यास धमकावल्याचा आरोपही या साक्षीदारांनी साक्ष नोंदवताना केला होता.

## एक ऑगस्टपासून महसूल सप्ताह

जमिनीवर अतिक्रमण करून राहणाऱ्या पात्र नागरिकांना त्यांच्या घरांचे पट्टे वाटप केले जाणार आहेत, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

३ ऑगस्ट रोजी शेत, रस्त्यांचे वाद मिटवण्यात येणार आहेत. पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजना अंतर्गत पाणंद आणि शिवपांदण रस्त्यांवरील वाद मिटवण्यासाठी तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी स्तरावर दोन अपीलनंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. प्रत्येक शेताला १२ फुटांचा रस्ता मिळेल आणि त्यांना क्रमांक दिले जातील. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण होईल आणि झाडे तोडल्यास वनविभागाच्या कायद्यांतर्गत कारवाई होईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविले जाणार आहे. महसूल मंडळ स्तरावर शिबिरांचे आयोजन होऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. आधार कार्ड, संजय गांधी योजना ओळखपत्र, अधिवास, जात, उत्पन्न आणि जात वैधता प्रमाणपत्रांचे वाटप होईल. वर्षातून चार वेळा अशी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.

५ ऑगस्ट रोजी डिबिटी अडचणी दूर करून विशेष सहाय्य योजनेअंतर्गत डिबिटी न झालेल्या लाभार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी तलाठी घरोघरी भेटी देतील आणि आधार कार्ड बँकेशी लिंक करण्याची प्रक्रिया पूर्ण करतील, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनींच्या शर्तभंग प्रकरणांचे सर्वेक्षण होऊन अतिक्रमण किंवा शर्तभंग आढळल्यास त्या जमिनी शासनाकडे परत घेतल्या जाणार आहेत. ७ ऑगस्ट रोजी कृत्रिम वाळू धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यशाळा आणि शिबिरांचे आयोजन होईल. १७ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मानक कार्यप्रणाली अवलंबली जाईल. महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ आयोजित होऊन उल्लेखनीय कामगिरीची दखल घेतली जाईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे अंजरूण ता. खालापुर जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी तिचे विद्यमान मालक श्री. श्रीकांत राजाराम दांडेकर, श्रीम. मनिषा सुभाष दांडेकर, कु. हर्षला सुभाष दांडेकर, कु. खुशी सुभाष दांडेकर यांचे कडुन त्याचा अविभक्त हिस्सा खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| स. नं. | हि. न. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १७७ | २ | ०.४०.०० पैकी लिहुन देणार यांचा ०.२०.०० गुंठे अविभक्त हिस्सा | ५.८६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही करार विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन चार्ज ताबा वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०१/०८/२०२५

**ॲड. प्रदिप मोतीराम सुर्वे**
ए २०२ स्वप्ननगरी को. ऑप. हौ. सोसायटी मुद्रे खुर्द कर्जत रायगड
फोन. नं. २२०१२६/९८५०१३५६५९

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे सामाईक मालक श्री.अस्पाक हाजीमिया बुबेरे, श्री.सलमान हाजीमिया बुबेरे, श्री.असगर हाजीमिया बुबेरे यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे आर्ढे, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत**

वरील सातबारा मिळकत सर्व्हे नं ९१/३ एकुण क्षेत्र ०.१४.१० गुंठे असलेली मिळकत विकत घेणार आहेत. तरी मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : ०१/०८/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता.कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री.निलेश केशव कोठेकर व सौ.सुजाता अभिमन्यू कोठेकर यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री.सतिश भालचंद्र वैरागी रा.पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**-जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा-आंबेघर, ग्रामपंचायत आंबेघर, मौजे-आंबेघर येथील गट नं.२१९ एकुण क्षेत्र ०-३९-३० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु. ७-४२ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-३९-३० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहीत आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पेण-रायगड.
दि. ०१/०८/२०२५

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६
तळमजला, शिवाजी पथ,
पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल सौ.अंजना रोनक कांकरिया यांनी त्या मिळकतीचे मालक १.श्री.जानु गोमा केवारी व २. सौ. निशा यशवंत फसाळ यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे चाफेवाडी, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १४ | ३ | १.७१.०० | ०.९९ |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ०१-०८-२०२५

**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं ९५६१७१९४९४
९०११७१६००१

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION (2nd CALL) TO SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

| | |
|---|---|
| **Tender No. :** E-Tender -04/2025-26 | **Online Downloading the RFx :** Dt. 01.08.2025, 00:00 Hrs. to 10.08.2025, 23:59 Hrs. |
| **Name of Tender :** Extension (2nd Call) to E-Tender for work of unloading of EHV materials/equipments by crane & labours at Major Stores, Panvel for FY 2025-26. | **Online Submission of the RFx :** On or Before Dt. 10.08.2025, 23:59 Hrs. |
| **Tender Fee :-** Rs. 500 /- + applicable GST | **Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 11.08.2025, at 10:00 Hrs. (If possible ). |
| **RFx No. - 7000036615** | **Online Opening of the Price bid :** Dt. 11.08.2025, at 15:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-
Suresh Suradkar
Executive Engineer
Major Stores, Panvel**

### शुद्धीपत्रक

दि.१२/०६/२०२५ रोजी पान क्र.७ वर अपर तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण अलिबाग यांच्या न्यायालयामधील ३२ ग दावा क्र.०९/२०२४ बाबत नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये गट नंबर ७९/४/ब असे चुकीचे नमुद करण्यात आले आहे. त्या ऐवजी गट नंबर ३०४ असे वाचण्यात यावे.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे तरी नमूद मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे साळोख तर्फे नीड आदिवासीवाडी ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| जमीन मालक नाव | सर्वे नं./हिस्सा नं | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री संदीप हरिश्चंद्र चव्हाण<br>श्री सचिन हरिश्चंद्र चव्हाण<br>सौ अश्विनी अनिल कांगणे<br>सौ निकिता नरेश मुंडे<br>सौ श्वेता सुनील भुसारी<br>श्रीमती अरुणा उर्फ कमळ हरीश्चंद्र चव्हाण | १९/१ | ०.५२.९० गुंठे क्षेत्र पो. ख. ०.४.०० गुंठे अशी एकूण खरेदी केलेले क्षेत्र ०.५६.९० गुंठे. | ८.१० |

सदरच्या शेतजमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याच्या त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्यूपत्र, कुळवहिवाट, बोजा, वगेरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीरातर्फे वकील यांचेकडून प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत

खरेदीदार तर्फे वकील
**ॲड. अक्षय रवींद्र भोपतराव**
मु.पो गौरकामथ ता कर्जत जि रायगड
मो नं ७७०९७७१४१२

### पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दूरध्वनी कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र./प.महा./पर्या./२१२५/प्र.क्र.०३/२३२/२०२५ दि. ३१/०७/२०२५

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, पनवेल महानगरपालिकेचा सन २०२४-२५ या कालावधीचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (ESR) पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ३१/०७/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. याबाबत नागरिकांनी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील सन २०२४-२५ पर्यावरण सद्यस्थिती अहवालाचे (ESR) अवलोकन करावे.

सही/-
**उपायुक्त (पर्यावरण)**
पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. राजेंद्र कृष्णनाथ नाईक व श्रीमती किरोन राजेंद्र नाईक यांच्या नावे मौजे - दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथे शिवम गार्डन्स या बिल्डिंगमधील विंग बी, बिल्डिंग नं. ३, ब्लॉक नं. २०४ हि मिळकत आहे. कै. राजेंद्र कृष्णनाथ नाईक हे दिनांक २१/०९/२०२२ रोजी मयत झालेले असून त्यांचे पश्चात त्यांना पत्नी किरोन राजेंद्र नाईक व मुली १) अल्का गौतम आचरेकर २) हिना आदित्य पेडणेकर हेच कायदेशीर वारस आहेत. वर नमुद ब्लॉक मिळकत किरोन राजेंद्र नाईक यांच्याच ताबेकब्जात असून त्यांच्याच मालकी हक्काची आहे. तसेच १) अल्का गौतम आचरेकर २) हिना आदित्य पेडणेकर यांची सदर मालकी हक्कास व ताबेकब्जास कोणतीही हरकत नाही.

तरी याबाबत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत खालील व्यक्तींकडे लेखी पुराव्यासह दाखल करावी. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०१/०८/२०२५

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को. ऑप. हौ. सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

**किरोन राजेंद्र नाईक**
अल्का गौतम आचरेकर
हिना आदित्य पेडणेकर
१ ए/२०४, आर्यवर्त सोसायटी,
अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९९

### जाहीर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आम्ही आमच्या अशिलांच्या निर्देशानुसार याखाली दिलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक विशेषत: वर्णन केलेल्या जमिनीबाबत (**"जमीन"**) दुकान क्रमांक ८, ग्लोबल, बिग स्प्लॅश समोर, अलिबाग–रेवस रोड, अलिबाग, रायगड येथे राहणारे **संजय ज्ञानदेव चव्हाण** (**"मालक"**) यांच्या मालकी हक्काची, शिर्षकाची आणि हितसंबंधाची चौकशी करीत आहोत.

सर्व व्यक्तींचे जमीनीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागा विरोधात / वर / संदर्भात मालकांचे हक्क, शिर्षक आणि हितसंबंधाबाबत वारसा, गहाणवट, विक्री, सामंजस्य करार, विक्रीसाठी करार, विकास हक्क प्रदान करुन, हस्तांतरण, नियुक्ती, भाडेपट्टा, उप–भाडेपट्टा, परवाना, धारणधिकार, भार, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, मार्गाचा अधिकार, भेट, संपादन, मागणी, कोणत्याही न्यासाअंतर्गत कोणताही ऋणभार किंवा फायदेशीर हक्क/हित, प्रिस्क्रीप्शन किंवा प्रीएम्शनचा अधिकार किंवा कोणताही करार किंवा इतर प्रवृत्ती किंवा कोणत्याही खटल्याअंतर्गत कोणत्याही न्यायालयाने किंवा प्राधिकरणाने पारित केलेला डिक्री, मनाई आदेश किंवा जप्ती किंवा निवाडा, खटला, प्रलंबित दावे, कोणत्याही निर्णय देणा–या प्राधिकरणाची डिक्री किंवा आदेश, विनिमय, विभाजन, मुखत्यारपत्र, मृत्युपत्र, वसीहत, एफएसआय, कुळ, विकसन अधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, ताबा, वितरण किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे दावा आणि/किंवा मागणी आणि/किंवा आक्षेप (एकत्रितपणे **''दावे''**) असल्यास त्यांनी याद्वारे अधोस्वाक्षरीदारांना खैतान ॲण्ड कंपनी, वकील, वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर–१सी, १३वा मजला, सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. अभिराज गांधी यांना लक्षवेधासाठी चिन्हांकीत करुन) या ईमेल वर सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्य प्रतींसहीत, सदर प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** कालवधीत लेखी कळवणे आवश्यक आहे, अन्यथा असे गृहीत धरले जाईल की असे कोणतेही दावे, हक्क, शिर्षक, इस्टेट किंवा हितसंबंध अस्तित्वात नाहीत आणि ते माफ केले आहेत किंवा सोडुन दिले आहेत असे समजले जाईल आणि ते मालक आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक नाही असे मानले जाईल.

**वर संदर्भित अनुसूची**
**(जमिनींचे वर्णन)**

जिल्हा अलिबाग, तालुका मुरुड, गाव म्हाळुंगे बुद्रुक येथे स्थित सर्व्हे क्रमांक ३३/१/ए असलेला मोजमापीत ९७.४० आर्स जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

| | | |
|---|---|---|
| उत्तरेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३४/२ |
| पूर्वेकडे वा त्या दिशेला | : | गावाची सीमा |
| दक्षिणेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३३/१/बी |
| पश्चिमेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३४/२ |

जिल्हा अलिबाग, तालुका मुरुड, गाव म्हाळुंगे बुद्रुक येथे स्थित सर्व्हे क्रमांक ३३/१/बी असलेला मोजमापीत ७२.६० आर्स जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

| | | |
|---|---|---|
| उत्तरेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३३/१/ए |
| पूर्वेकडे वा त्या दिशेला | : | गावाची सीमा |
| दक्षिणेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३४/२ |
| पश्चिमेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३४/२ |

जिल्हा अलिबाग, तालुका मुरुड, गाव म्हाळुंगे बुद्रुक येथे स्थित सर्व्हे क्रमांक ३४/३ असलेला मोजमापीत ८५ आर्स जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

| | | |
|---|---|---|
| उत्तरेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३३/१/बी |
| पूर्वेकडे वा त्या दिशेला | : | गावाची सीमा |
| दक्षिणेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३४/४ |
| पश्चिमेकडे वा त्या दिशेला | : | गट क्रमांक ३४/२ आणि ३४/४ |

आज दिनांक १ ऑगस्ट २०२५

**खैतान ॲन्ड कंपनी करीता**
सही /–
अभिराज गांधी
भागीदार

# खारेपाट विभाग लाल बावटेमय

## ■ शेकाप कार्यकर्त्यांकडून जोरदार तयारी ■ नाक्या-नाक्यावर वर्धापन दिनाच्या शुभेच्छांचे बॅनर्स

**। पेझारी । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचा ७८ वा वर्धापन दिन पनवेल येथे शनिवार, दि. २ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येणार आहे. या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर खारेपाट विभागातील कार्यकर्त्यांकडून जोरदार तयारी सुरू आहे. दरम्यान, खारेपाट विभागात नाक्या-नाक्यावर वर्धापनदिनाला शुभेच्छा देणारे मोठ मोठे बॅनर्स कार्यकर्त्यांकडून लावण्यात आले आहेत. पेझारी नाका तर पताका, झेंडे आणि बॅनर्समुळे लाल बावटेमय झाल्याचे चित्र दिसून येत आहे. वर्धापन दिनाचा कार्यक्रम यशस्वी व्हावा, यासाठी खारेपाट विभागातील शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.

दरम्यान, पनवेल येथील वर्धापन दिनासाठी पेझारी विभागातील खारेपाट्यांतून शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, त्याची जोरदार तयारी सुरू झाली आहे. गेल्या चार दिवसांपासून महाराष्ट्र राज्य सोशल मीडिया सेलच्या अध्यक्ष चित्रलेखा पाटील, अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, सहचिटणीस नरेश म्हात्रे, तालुक्यातील विविध सेलचे सर्व पदाधिकारी यांच्या माध्यमातून या मेळाव्याची जोरदार तयारी झाली असून, अनेक ठिकाणी या मेळाव्याचे गावाच्या वेशीवर बॅनर लावून ‘चलो पनवेल, चलो पनवेल’ अशा प्रकारचा जल्लोष सुरू केलेला आहे.



### पेझारी नाक्यावर होणार भाईंचे स्वागत

**पेझारी नाक्यावर या वर्धापन दिनाची तयारी म्हणून रस्त्याच्या दुतर्फा झेंडे व पताका लावण्यात आल्या असून, पेझारी नाका येथे सकाळी नऊ वाजता पंत बाळेकुंद्री चौक येथे राज्य सरचिटणीस भाई जयंत पाटील, सुप्रिया पाटील, महाराष्ट्र राज्य सोशल मीडिया सेल अध्यक्ष चित्रलेखा पाटील, पक्षाचे पदाधिकारी यांचे खारेपाट विभागातील कार्यकर्ते स्वागत करणार असून, त्याची जोरदार तयारी चालू असल्याची माहिती अलिबाग तालुका सोशल मीडिया सेलचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, विविध सेलचे पदाधिकारी यांनी यावेळी दिली.**

पेझारी विभागातील शेतकरी कामगार पक्षाच्या विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी, कुर्डूस, चिखली, कुसुंबळे, मेढेखार, श्रीगाव, पोयनाड, ताडवागळे, वडवली, बांधण, वाघोडे, कोपर, चरी, शहापूर, मोठे शहापूर, ढेरंड, घसवड, शाहबाज या गावांमध्ये जाऊन कार्यकर्त्यांशी संपर्क साधला असता, कार्यकर्त्यांनी अनेक दुचाकी, चारचाकी, बसेस आदी वाहनांची वर्धापन दिनासाठी जाण्याची तयारी केली असून, मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे सांगितले.

## गुप्तधनाच्या आमिषाने ३९ लाखांची फसवणूक

**पनवेल :** शेतावर असलेले गुप्तधन बाहेर काढून पूजाविधी करून कुटुंबाचा होणारा त्रास कमी करून देतो त्यासाठी पूजेकरिता ३९ लाख ७० हजारांचे दागिने व रोकड घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी तोसीफ मुजावर, मेहताब मुजावर, अझर मुजावर यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वाजे येथील ४१ वर्षीय ही इसमाची हाती घेतलेली कामे अपूर्ण राहात असल्याने त्यांना आर्थिक नुकसान व मानसिक त्रास होत होता. यावेळी त्यांना पनवेल रेल्वे स्टेशनसमोरील ज्योतिषाकडे मित्र घेऊन गेला. ज्योतिषाने मांत्रिक तोसिफ मुजावर व सोबत दोन लोकांना घेऊन त्यांच्या कार्यालयात आले. यावेळी त्यांनी शेतावरून घरी अडचण येत आहेत, घरातील लोकांवर करणी केली आहे असे सांगून शेती दाखवण्यास सांगितले. त्यानंतर वाजेच्या फार्म हाऊसवर चार दिवस विधी केला आणि त्यानंतर करंजाडे येथील दुसऱ्या शेतावर पूजावधीसाठी खर्च सांगून खड्डा खोदण्यास सांगितले. पूजा झाल्यावर सोन्याचा ताविज, सोन्याची चैन देण्यात आल्या. त्यानंतर पुन्हा तोसीफ याने शेवटचा विधी करावा लागेल असे सांगितले आणि घरातील सोने व काही रक्कम याची मागणी केली. यावेळी त्यांना गंठण व रोख रक्कम देण्यात आली. त्यानंतर त्यांना कपड्यात काहीतरी बांधून दिले. मी परवानगी दिल्याशिवाय काहीही उघडून पाहू नका नाहीतर गुप्तधनाची व सोन्याची माती होईल, असे सांगून तो निघून गेला. एक महिन्यापासून येतो असे बोलून निघून गेलेला मांत्रिक परत न आल्याने शंका आली. त्यामुळे त्यांनी बहिणीच्या घरी जाऊन कपड्यात बांधलेले गाठोडे सोडून पाहिले असता त्यात माती असल्याचे लक्षात आले.

# अलिबागवर प्रेम करणारे खरे व्यक्तिमत्त्व

## ■ ॲड. मानसी म्हात्रे यांचे प्रतिपादन

### ■ स्व. गजेंद्र दळी यांची अलिबागमध्ये शोकसभा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

स्व. गजेंद्र दळी हे अलिबागमधील एक ज्येष्ठ उद्योजक होते. आपल्या कार्यकाळात त्यांनी अलिबागमधील अनेक लघुउद्योगांना चालना दिली. समाजातील वंचित घटकासाठी कायम ते सक्रीय होते. त्यांच्या निधनाने अलिबागचे फार मोठे नुकसान झाले आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या कारभारात त्यांचे वाखाणण्याजोगे योगदान होते. ते अलिबागचे सच्चे प्रेमी होते. अलिबागवर प्रेम करणारे खरे व्यक्तिमत्त्व होते. भाऊंनी अनेकांना व्यवसायात प्रोत्साहन देण्याचे काम केले आहे. सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम त्यांनी कायमच केले आहे, असे प्रतिपादन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.



(छायाचित्र : समीर मालोदे)



अलिबागचे ज्येष्ठ उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते स्व. गजेंद्र तुकाराम दळी यांच्या स्मरणार्थ अलिबागमध्ये शोकसभा आयोजित करण्यात आली. लायन्स क्लब अलिबाग, ज्येष्ठ नागरिक संघटना अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील वेव्हज हॉटेलमधील सभागृहात गुरुवारी (दि.३१) ही सभा घेण्यात आली. यावेळी मानसी म्हात्रे बोलत होत्या.

यावेळी शेकाप राज्य कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक, शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, लायन्स क्लबचे अनिल जाधव, अनिल चोपडा, ॲड. नीलम हजारे, शहरातील वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळी, सत्यजित दळी, विश्वजीत दळी व दळी कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रातील मंडळींनी स्व. गजेंद्र दळी यांच्या कार्याची माहिती देत आदरांजली अर्पण केली.

## वस्ताऱ्याने वार करणारा गजाआड

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात पादचारी इसमावर वस्ताऱ्याने वार करून जखमी करणाऱ्या व रोख रक्कम व मोबाईल फोन लंपास करणाऱ्या एका तडीपार गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे. एजाज सलीम शेख (२५) असे आरोपीचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुकेश छेडा हे पनवेल, नाडकर्णी हॉस्पिटलजवळ राहात असून, ते पनवेल रेल्वे स्टेशन येथे उतरून घरी जाण्यासाठी निघाले. पायी चालत जात असताना एक अनोळखी इसम यांच्याजवळ आला आणि गांजा आहे का, असे विचारण्याचा बहाणा केला. दरम्यान, त्यांच्याकडील रोख रक्कम आणि मोबाईल काढून घेतला. त्याला प्रतिकार करत असताना अनोळखी इसमाने वस्तारा काढला आणि त्यांच्या शरीरावर वार करून त्यांना जखमी केले आणि तो झोपडपट्टीमध्ये पळून गेला. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीला अटक करण्यात आली.

भारतीय शेतकरी कामगार पक्ष
रायगड-अलिबाग
वर्धापन दिन
दिनांक २ ऑगस्ट २०२५

लाल सलाम

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा **शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०-०० वाजता सेक्टर नं.५/ए, गुरूद्वाराच्या बाजूला पोलीस ग्राऊंड, नवीन पनवेल येथे पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील** व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला,
**सुरेश नामदेव खैरे**
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग



# गरजले ते, पडतील काय?

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची मर्जी फिरली आहे. त्यांनी भारतावर तब्बल २५ टक्के आयातशुल्क लागू केले आहे. शिवाय, रशियाशी व्यापार चालू ठेवल्यास दंड म्हणून आणखी कर लावला जाईल असा इशारा दिला आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे इथल्या गरीब माणसांवरही थेट परिणाम होणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे रशियाकडून मिळणारे स्वस्त तेल खरेदी करणे आपण बंद केले तर आपल्याला जगाच्या बाजारातून महागाईचे तेल घ्यावे लागणार आहे. त्यामुळे पेट्रोल, डिझेल व गॅसच्या किंमती तात्काळ वाढणार आहेत. नरेंद्र मोदी देशातल्या प्रत्येक गोष्टीसाठी पंडित नेहरुंना शिव्या देऊ शकतात. पण आता ट्रम्प यांनी आपल्या गळ्याला लावलेला फास त्यांचा त्यांनाच सोडवावा लागणार आहे. त्यासाठी नेहरू, इंदिरा किंवा कॉंग्रेस यांच्यावर खापर फोडून नामानिराळे होणे शक्य होणारे नाही. ट्रम्प हे एरवी नरेंद्र मोदींना मित्र म्हणतात. फार मोठे नेते म्हणतात. भारत हा एक सुंदर देश आहे असे म्हणतात. पण प्रत्यक्षात ते भारतावर रागावलेले आहेत हे ते सत्तेत येण्याच्या अगोदरपासून दिसत होते. चार वर्षांपूर्वी याच ट्रम्पच्या निवडणुकीत मोदींनी जणू प्रचार केला होता. अगली बार ट्रम्प सरकार असा नारा दिला होता. अमेरिकेतील भारतीयांची मते ट्रम्पना मिळतील असा भरोसा दिला होता. पण तरीही ट्रम्प हरले होते. आता तर ते विक्रमी मतांनी विजयी झाले आहेत. जानेवारीत सत्तेत आल्यापासून दांडपट्टा फिरवत आहेत. आपल्या शपथग्रहण समारंभाला त्यांनी मोदींना बोलावले नाही. भारत प्रचंड प्रमाणात कर लावतो अशी तक्रार मोदींच्या देखत केली. मोदींचे स्वागत करायला ते दाराशी गेले नाहीत. नंतर पहलगाम हल्ल्यानंतर भारत व पाकिस्तानला शस्त्रसंधी करायला आपणच भाग पाडले असे त्यांनी आजवर तीस वेळा सांगून झाले आहे. त्याबद्दल मोदी यांनी ट्रम्प यांना थेटपणे सुनवावे अशी भारतीयांची अपेक्षा आहे. पण एरवी ५६ इंची छाती असल्याचे सांगणारे मोदी हे धाडस दाखवू शकलेले नाहीत. ट्रम्प यांना इतके सांभाळून घेऊनही त्यांनी आयातशुल्क लावण्याचे सोडलेले नाही.

### वाटाघाटींचा शून्य उपयोग

ट्रम्प यांनी एप्रिलमध्ये सर्व जगावर ३५ टक्के, ५० टक्के असे आयातशुल्क लावले होते. तोवरचे त्याचे मित्रदेश असलेले कॅनडा, ब्रिटन किंवा युरोपीय महासंघ हेदेखील त्यातून सुटले नव्हते. चीनवर तर १७५ टक्के कर लावण्यात आले होते. त्यावेळी सर्वांचेच धाबे दणाणले होते. पण ट्रम्प यांची ही चलाखी आहे हे थोड्याच दिवसात सर्वांच्या लक्षात आले. नंतर प्रत्येक देशाचे नेते ट्रम्प यांच्याकडे जाऊन सवलती मागू लागले. मग जुन्या काळात बादशहा जसे मर्जी आली की मोत्याचे हार बक्षिस म्हणून अंगावर फेकत असत तसे ट्रम्प महाराज त्यांना मनाला येईल त्याप्रमाणे काही देशांच्या बाबत उदार झाले. त्यांचा कर कमी झाला. खुद्द चीनवरचा करही आता खूप कमी झाला आहे व लवकरच अमेरिका व त्यांचा करार होईल. याच रीतीने ब्रिटन व युरोपीय संघांनीही सवलती पदरात पाडून घेतल्या. वास्तविक नरेंद्र मोदी हे अशा वाटाघाटींसाठी लगेचच ट्रम्प यांना भेटले होते. तेव्हा ट्रम्प यांनी तोंडदेखली स्तुती केली होती. मग एक ऑगस्टपासून नवीन कर लागू होतील असे सांगून दिलासा दिला होता. ही मुदत शुक्रवारी संपत होती. पण त्यात भारताला अमेरिकेसोबत नक्की स्वरुपाचा करार करता आला नाही. मधल्या काळात वाटाघाटी खूप झाल्या. आपले पियूष गोयल अमेरिकेत बराच काळ जाऊन आले. चर्चा चांगली चालू आहे असे ते सांगत होते. पण त्यांच्या बनियागिरीची मात्रा ट्रम्प यांच्यापुढे चालली नाही. त्यांनी एकतर्फी २५ टक्के कराची घोषणा करून टाकली. ट्रम्प यांच्या पहिल्या घोषणेनुसार जशास तसे कर लागू होणार होते. म्हणजे अमेरिकी औषधांवर भारत जर ५० टक्के आयातकर लावणार असेल तर भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या औषधांवरही तेवढाच कर लावला जाणार होता. नंतर हे धोरण बदलले व आता सरसकट एका कराची घोषणा झाली आहे.

### मोदी झुकणार?

या नव्या धोरणामुळे भारताच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या निर्यातीवर परिणाम होणार नाही. कारण ती या करातून वगळण्यात आलेली आहे. पण कपडे, दागदागिने, औषधे, कोळंबीसारखे मासे, शेतमाल अशांच्या निर्यातीला मात्र जबर फटका बसणार आहे. कारण यावर आता २५ टक्के कर बसणार असल्याने भारताच्या वस्तू तितक्या प्रमाणात महाग होणार आहेत. या सर्व क्षेत्रात भारताचे प्रतिस्पर्धी असणारे व्हिएतनाम, इंडोनेशिया, मलेशिया, इत्यादींवर मात्र त्या मानाने कमी कर आहे. व्हिएतनामवर वीस टक्के तर इंडोनेशियावर केवळ पंधरा टक्के कर असेल. आधीच्या योजनेत या देशांवरही जबर कर होता. पण त्यांनी अमेरिकेकडून वाटेल तेवढे क्रूड तेल व गॅस खरेदी करायला मान्यता दिली. शिवाय, अमेरिकी शेतीमाल, कपडे, मोटारी व इतर वस्तूंना आपल्या देशात मुक्तद्वार किंवा जवळपास शून्य कर लागू करण्याचे मान्य केले. भारतानेही हेच करावे अशी अमेरिकेची मागणी आहे. विशेषतः सोयाबीन, मका व दुधाचे पदार्थ तसेच मोटारगाड्या यावरचे कर काढून टाकावे अशी अमेरिकेची मागणी आहे. तसे केले तर भारतातले शेतकरी देशोधडीला लागतील. आधीच आपले कापूस, मका किंवा सोयाबीनचे शेतकरी भाव नाहीत म्हणून आत्महत्या करीत आहेत. दूध धंदा आतबट्ट्याचा ठरला आहे. त्यात आणखी स्वस्त अमेरिकी आयात होऊ लागली तर शेती क्षेत्राचे दिवाळे वाजेल. त्यामुळे मोदीच काय कोणत्याही सरकारला ट्रम्प यांची ही मागणी मान्य करणे शक्य होणारे नाही. रशियातून तेल आयात करू नका हा ट्रम्प यांचा आग्रहही आपल्या मुळावर उठणारा आहे. रशियाने युक्रेनसोबत युद्ध चालू ठेवले आहे. त्याची शिक्षा म्हणून ट्रम्प रशियावर निर्बंध घालणार आहेत. भारत व चीन या रशियाच्या आयातदारांना दंड करणार आहेत. याचा मोठा परिणाम होणार आहे. रिलायन्स हा देशातील सर्वात मोठा तेलशुद्धीकरण करणारा उद्योग आहे. रिलायन्स बाहेरील देशातून कच्चे वा क्रूड तेल आणतो व इथे शुद्ध करून पेट्रोल इत्यादी करतो. ते तो निर्यातही करतो. पूर्वी आपण इराण व इराकमधून अधिक तेल आणत असू. पण आता रशियाकडून जास्त खरेदी करतो. रिलायन्सच्या एकूण तेल खरेदीपैकी ५३ टक्के तेल एकट्या रशियाकडून येते. हीच स्थिती देशातील इतर कंपन्यांचीही आहे. उद्या रशियाचे तेल बंद केले तर सर्व गणिते बदलणार आहेत. कालपर्यंत नेहरू व इंदिरेला शिव्या देणारे मोदी सरकार आता ट्रम्प यांचा दबाव मान्य करते की झुगारून देते हे दिसेलच. कालपर्यंत संसदेत जे गरजले ते पडतील काय याची ही कसोटी आहे.

---

विचार

# स्वच्छ ऊर्जेच्या निर्मितीत उंच झेप

***स्वच्छ ऊर्जेच्या दिशेने भारताने मोठी कामगिरी केली असून पॅरिस करारात निश्चित केलेल्या अंतिम मुदतीच्या पाच वर्षे आधी एक लक्ष्य साध्य केले आहे. भारताने आपल्या वीजनिर्मिती क्षमतेच्या ५० टक्के क्षमता जीवाश्म इंधन नसलेल्या स्रोतांपासून साध्य करण्याचा पराक्रम केला आहे. यासाठी पॅरिस करारात २०३० ची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती; परंतु भारताने हे लक्ष्य वेळेच्या खूप आधी पूर्ण केले आहे.***



**प्रा. सुखदेव बखळे**

भारताची एकूण वीजनिर्मिती क्षमता आता ४८४.८ गीगावॉटपर्यंत पोहोचली आहे. यापैकी २३२.८ गीगावॉटपेक्षा जास्त वीज गैर-जीवाश्म इंधन स्रोतांपासून निर्माण होऊ लागली आहे. त्यामध्ये सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, मोठे जलविद्युत प्रकल्प आणि अणुऊर्जा प्रकल्प यांचा समावेश आहे. जीवाश्म इंधन नसलेले ऊर्जा स्रोत, म्हणजेच कोळसा, तेल किंवा नैसर्गिक वायूसारख्या जीवाश्म सेंद्रिय पदार्थांपासून मिळवले जात नाहीत. ही इंधने अधिक पर्यावरणपूरक आहेत. कारण ती कमी किंवा अजिबात हरितगृह वायू निर्माण करत नाहीत. २०२१ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदल परिषदेत (कोप २६) पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या आश्वासनानुसार भारत २०३० पर्यंत अक्षय स्त्रोतांपासून आपल्या ऊर्जेच्या गरजांपैकी ५० टक्के भाग पूर्ण करणार होता.

त्याचबरोबर देश कार्बन उत्सर्जन अंदाजे एक अब्ज टनांनी कमी करेल, २००५ च्या पातळीपेक्षा कार्बन तीव्रता ४५ टक्क्यांनी कमी करेल आणि २०७० पर्यंत शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य साध्य करेल, असे म्हटले होते. २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये भारताच्या अक्षय ऊर्जा उत्पादनात वेगाने वाढ झाली आहे. २०२२ नंतरची ही सर्वाधिक वाढ आहे. त्याच वेळी, कोळशापासून वीजनिर्मितीमध्ये सुमारे तीन टक्क्यांनी घट झाली आहे. २०२४ मध्ये भारताने सौर आणि पवन ऊर्जेपासून सुमारे २८ गीगावॅट वीजनिर्मिती केली होती. या वर्षी जानेवारी ते मे दरम्यान अशा प्रकारे १६.३ गीगावॅट वीजनिर्मिती करण्यात आली आहे. मोठ्या जलविद्युत केंद्रांना बाजूला ठेवून जून अखेरपर्यंत भारतातील एकूण वीजनिर्मितीमध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा सुमारे १८४.६ गीगावॅटवर पोहोचला आहे. भारताने २०२२ पर्यंत १७५ गीगावॅट अक्षय ऊर्जानिर्मितीचे समोर ठेवलेले लक्ष्य अधिक प्रयत्न करत आता मिळवले.

भारताने २०३० पर्यंत जीवाश्म नसलेल्या इंधनांपासून ५०० गीगावॅट वीजनिर्मितीचे लक्ष्य ठेवले. तथापि, प्रगती होऊनही गेल्या वर्षीपर्यंत भारतातील विजेच्या मागणीपैकी दोन तृतीयांश गरज जीवाश्म इंधनांनी भागवली जात होती. देशाच्या विजेच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी २०३२ पर्यंत कोळशावर आधारित वीजनिर्मिती क्षमता ८० गीगावॅटपर्यंत वाढवण्याची योजना आहे. ‘आयईईएफए’ या जागतिक थिंक टँकच्या अहवालानुसार भारत अजूनही संध्याकाळी असणारी सर्वाधिक वीज मागणी पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कोळशावर अवलंबून आहे. उत्सर्जन आणि किंमतीतील अस्थिरता कमी करण्यासाठी भारताने ऊर्जा साठवणूक आणि मागणी व्यवस्थापन क्षमता वाढवावी, असे हा अहवाल सुचवतो. भारताची स्वच्छ ऊर्जा योजना आता सौर आणि पवन ऊर्जेच्या पलीकडे गेली असून त्यात अणुऊर्जा, जलविद्युत, हरित हायड्रोजन, बॅटरी साठवणूक आणि नवीन उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा समावेश आहे. एका नवीन अहवालात दिसून आले आहे की अक्षय ऊर्जा उद्दिष्टे योग्य धोरणे आणि गुंतवणुकीशी जोडली गेल्याचा फायदा जागतिक अर्थव्यवस्था आणि पर्यावरणालाच होईल असे नाही, तर त्यामुळे लाखो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येईल. यामुळे गरिबीच्या चक्रात अडकलेल्या लाखो लोकांचे जीवन सुधारू शकते, असा अंदाज आहे. हा अहवाल संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी), डेन्व्हर विद्यापीठ आणि ऑक्टोपस एनर्जी यांनी संयुक्तपणे तयार केला आहे. स्वच्छ ऊर्जेसाठी वेळेवर पावले उचलली आणि सरकारने त्यात सुज्ञपणे गुंतवणूक केल्याचा किती फायदा होईल हे समजून घेणे हा त्यामागील उद्देश होता.

अहवालानुसार या धोरणाचा अवलंब केल्याने तीन प्रमुख फायदे मिळू शकतात. यामुळे वाढते उत्सर्जन कमी होईल. आर्थिक विकासासोबतच समाजातील कमकुवत घटकांनाही फायदा होईल. अहवालात मांडण्यात आलेल्या निष्कर्षांनुसार या बदलामुळे ऊर्जाक्षेत्रात २०.४ ट्रिलियन डॉलर्सची बचत होऊ शकते. यासोबतच २०६० पर्यंत जागतिक जीडीपीमध्ये २१ टक्के वाढ आणि प्रति व्यक्ती सरासरी उत्पन्नात सहा हजार डॉलर्सची वाढ होऊ शकते; परंतु आपण जुन्या मार्गावर चालत राहिल्यास हे शक्य होणार नाही. या अभ्यासात, शास्त्रज्ञांनी तीन वेगवेगळ्या परिस्थितींचे तुलनात्मक विश्लेषण केले आहे. यातील पहिली परिस्थिती अशी की गोष्टी आहेत तशाच चालू राहिल्या पाहिजेत. म्हणजे जगाने बदल स्वीकारण्याऐवजी जुन्या मार्गावर चालू ठेवले पाहिजे.

या परिस्थितीत जग २०६० पर्यंत पन्नास टक्के ऊर्जेच्या गरजांसाठी कोळसा आणि तेल यासारख्या पारंपारिक जीवाश्म इंधनांवर अवलंबून राहिल्यास पृथ्वी अत्यंत उष्ण होईल. यामुळे पृथ्वीचे तापमान २.६ अंश सेल्सिअसने वाढू शकते, असा अंदाज आहे. याचा थेट परिणाम वीज, पाणी, अन्न, शिक्षण, पोषण आणि स्वच्छता यासारख्या महत्त्वाच्या विकासकामांवर होईल. यामुळे कोट्यवधी लोक गरिबीत जाऊ शकतात, अशी भीती आहे. दुसरा मार्ग म्हणजे स्वच्छ ऊर्जेकडे वेगाने वाटचाल करणे, कारण पहिल्या जागतिक आढाव्यामध्ये ठरवण्यात आले आहे की देशांनी सौर आणि पवन ऊर्जा यासारख्या तिप्पट स्वच्छ ऊर्जेचा वापर करावा.

दोनदा ऊर्जा वाचवली गेली आणि जीवाश्म इंधनासारख्या पारंपारिक इंधनांचा वापर हळूहळू बंद केला गेला, तर २०६० पर्यंत जग आपल्या ऊर्जेच्या गरजांपैकी फक्त बारा टक्के गरजांसाठी जीवाश्म इंधनांवर अवलंबून राहील. यासोबतच, हा मार्ग पृथ्वीचे तापमान दोन अंश सेल्सिअसपेक्षा कमी ठेवण्यासदेखील उपयुक्त ठरू शकतो. यामुळे पर्यावरणालाही दिलासा मिळेल. कोळशापासून स्वच्छ ऊर्जेकडे वळल्याने भारताला दर वर्षी १.६ लाख कोटी रुपयांचा फायदा होईल. तिसरा पर्याय म्हणजे स्वच्छ ऊर्जेचा जलद विस्तार तसेच व्यवस्थेत गुंतवणूक करणे आणि शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी सुसंगत धोरणे समाविष्ट करणे. या मार्गाचा अवलंब केल्यास आजच्या परिस्थितीच्या तुलनेत सर्व लोकांना वीज आणि स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधनाची सुविधा मिळेल. या उपायांमुळे १९.३ कोटी लोकांना गरिबीच्या गर्तेतून बाहेर पडण्यास मदत होईल. तसेच १४.२ कोटी लोकांना पूर्ण जेवण मिळेल आणि कुपोषण कमी होईल. इतकेच नाही तर, या धोरणांचा अवलंब केल्याने ५५ कोटी लोकांना स्वच्छ पाणी आणि स्वच्छता यासारख्या मूलभूत सुविधा मिळू शकतील. स्वच्छ ऊर्जेच्या उद्दिष्टांना योग्य धोरणे आणि गुंतवणुकीशी जोडणे आर्थिकदृष्ट्या खूप फायदेशीर ठरू शकते. अहवालानुसार तिसऱ्या मार्गाचा अवलंब केल्याने एकूण २०.४ ट्रिलियन डॉलर्सची बचत शक्य आहे. यापैकी ८.९ ट्रिलियन डॉलर्स ऊर्जा बचतीद्वारे वाचवले जातील तर ११.५ ट्रिलियन डॉलर्स स्वस्त स्वच्छ ऊर्जेच्या वापराद्वारे वाचवले जातील.

या अभ्यासातून दिसून आले आहे की, स्वच्छ ऊर्जेचे भविष्य शक्य आहे; परंतु यासाठी आपण विकासाशी संबंधित समावेशक धोरणांसह स्वच्छ ऊर्जेच्या उद्दिष्टांना एकत्र करून पुढे जाणे आवश्यक आहे. अहवालानुसार पॅरिस कराराची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जगाला ऊर्जा प्रणालीमध्ये जलद मोठे बदल करावे लागतील; जेणेकरून ते अधिक स्वच्छ आणि कार्यक्षम बनू शकेल. यासोबतच अनुकूलन, नैसर्गिक उपाय आणि आपत्ती लवचिकता यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्येदेखील काम करावे लागेल. हे सर्व बदल एका व्यापक विकास चौकटीअंतर्गत व्हायला हवेत, जिथे स्वच्छ ऊर्जेचा विस्तार लोकांसाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर असेल. अहवालात असेही अधोरेखित केले आहे की, २०२५ मध्ये स्वच्छ ऊर्जेतील गुंतवणूक २.२ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. हे सलग दुसरे वर्ष आहे, जेव्हा ही गुंतवणूक पारंपारिक (जीवाश्म) इंधनांपेक्षा जास्त असेल.

आतापर्यंत जगात ४,४४८ गीगावॅट अक्षय ऊर्जा क्षमता स्थापित करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की ९० टक्के नवीन वीज आता स्वच्छ ऊर्जेपासून येत आहे. सौर, पवन आणि ऊर्जा साठवणुकीतील तांत्रिक प्रगती या बदलाला गती देत आहे. तथापि, जग अजूनही ७० टक्के ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जीवाश्म इंधनांवर अवलंबून आहे. या पार्श्वभूमीवर भारताने २०३० च्या उद्दिष्टापेक्षा पाच वर्षे आधीच स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला, हे दखलपात्र आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)**

---

चर्चा आजची

# राजकारण तरुण नेतृत्वाच्या प्रतीक्षेत



**सुयोग आंग्रे**

राजकारण हा ‘व्यवसाय’ मानला जाऊ शकत नाही, परंतु इतर व्यावसायिकांप्रमाणेच सेवानिवृत्तीचा प्रश्न राजकारणात असणे गरजेचे बनले आहे. भारत हा एक असा देश आहे जो तरूणांची मोठी लोकसंख्या आहे. या कारणास्तव, राजकारणात नैसर्गिकरित्या तरुणांचे नैसर्गिक प्रतिनिधित्व देखील अपेक्षित आहे. तथापि, बऱ्याच बाबींमुळे हे शक्य नाही. तसे, राजकारणात तरुणांचे पुरेसे प्रतिनिधित्व नसणे केवळ भारतातच दिसून येते, तर जगातील बहुतेक देशांमध्ये हा कल दिसून येतो. एका अभ्यासानुसार, प्रमुख लोकशाही देशांमधील १० टक्के पेक्षा कमी नेते वयाच्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. हीच प्रथा भारतात सुरू आहे. जर आपण १९५२ ते २०२४ दरम्यान तयार झालेल्या लोकसभेकडे पाहिले तर त्याचे सरासरी वय सतत वाढत आहे. या अनुक्रमात सध्याच्या लोकसभेचे सरासरी वय सर्वाधिक आहे.

राजकीय व्यवस्थेत तरुणांचे समायोजन योग्य प्रमाणात केले जात नाही. त्याच्या कारणांच्या तपासणीतील सर्वात मोठा पैलू म्हणजे राजकारणात प्रवेश बहुतेकदा वृद्धावस्थेत आढळतो. डॉक्टर, अभियंता किंवा इतर सेवांमध्ये जेथे एखादी व्यक्ती लहान वयातच आपले काम सुरू करते, हा प्रवास राजकारणात तुलनेने उशीरा सुरू होतो. वयाच्या ४० ते ४५ व्या वर्षी, एक व्यक्ती राजकीय जीवनाची पहिली पायरी चढते. वयाच्या ४५ ते ५० व्या वर्षी ते नगरसेवक, आमदार किंवा खासदार बनतात. ६०-६५ वर्षे मुख्यमंत्री किंवा पंतप्रधानांसारख्या अव्वल पदावर पोहोचणे खूप सामान्य आहे. हेच कारण आहे की राजकारणात ‘वृद्ध’ लोकांना ‘तरुण तुर्क’ देखील दिले जाते. मोठ्या संख्येने लोक देखील आहेत जे दुसऱ्या व्यवसायात आहेत आणि राजकारणात गुंतलेले आहेत. हे खरे आहे की घटनेने २५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कोणत्याही व्यक्तीची पात्रता सार्वजनिक प्रतिनिधी म्हणून निवडण्यासाठी निश्चित केली आहे, परंतु प्रत्यक्षात ही संकल्पना मोठ्या प्रमाणात लक्षात आली नाही. काही तरुण नेते लोकसभा आणि मंत्रीपदाच्या पदांवर सभागृहात पोहोचले आहेत, परंतु त्यातील बहुतेक लोक राजकीय कुटुंबातील आहेत.निवडणुकीत तरुण नेत्यांचा सहभागही फारच मर्यादित आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ३० वर्षाखालील ८,००० हून अधिक उमेदवार शंभरही नव्हते. पक्ष संघटनेतही, तरुणांना योग्य वेळी जागा मिळत नाही. जर आपण देशातील सर्व मुख्य पक्षांच्या तरुण युनिट्सकडे पाहिले तर जवळजवळ प्रत्येकजण सुमारे ४० वर्ष वयाचा आहे. प्रतिनिधित्वाव्यतिरिक्त इतर कामगिरीबद्दल बोलणे, वृद्ध अनुभवी नेते चांगले किंवा तरुण नेते आहेत की नाही यावर देखील चर्चा होऊ शकते. तरुण नेत्यांच्या कार्यरत शैलीत नवीन विचारांची झलक पाहायला मिळते. ते दीर्घकालीन अजेंड्यावर काम करतात. जोखीम घेण्यास अजिबात संकोच करीत नाहीत कधीकधी याचा खूप सकारात्मक परिणाम होतो. याउलट, वृद्ध नेते त्यांच्या अनुभवांच्या आधारे पुढे जातात. आपत्ती किंवा संकटाच्या वेळी त्यांचा अनुभव खूप उपयुक्त आहे. तणाव किंवा संघर्ष झाल्यासही ते अधिक संयमाने अधिक काम करतात. बजेटच्या प्राथमिकतेबद्दल बोलणे, तर युवा नेते पायाभूत सुविधांवर अधिक लक्ष केंद्रित करतात, वरिष्ठ नेते कल्याण योजनांना प्राधान्य देतात. राजकीय नेतृत्वाच्या बाबतीत, सांगायचे झाले तर नेता महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या घेण्यासाठी योग्य आहे की नाही हे तपासण्याची गरज आज निर्माण झाली आहे. त्या राजकीय नेत्याचा अनुभव त्याच्या वयापेक्षा जास्त असला पाहिजे. कारण राजकारणात किंबहुना राजकीय पटलावर डाव मांडताना अशा लोकांना महत्त्वपूर्ण निर्णय घ्यावे लागतात, म्हणून त्यांच्यासाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी असणे फार महत्वाचे आहे. यात स्वतःची जोखीम आणि वयाची मर्यादा देखील आहेत.

एक, नेत्याच्या आरोग्याशी संबंधित माहिती राजकीय स्थिरतेपासून अर्थव्यवस्थेपर्यंत पाहिली जाऊ शकते. दुसरे म्हणजे, त्यात गोपनीयतेचा मुद्दा देखील आहे, कारण एखाद्या आजाराच्या घटनेत वैयक्तिक प्रतिष्ठेचीही काळजी घ्यावी लागते. तरुणांना अधिक चांगले प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि राजकारणाचा समावेश करण्यासाठी संधी देण्याची काळाची गरज आहे. देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यासारख्या पदांवर पोहचण्यासाठी तरुण राजकीय नेतृत्वांनास्थानिक स्वराज्य संस्था ते विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीचा अनुभव अर्थात राजकीय डावपेचांचा ज्ञान आणि अनुभव घेण्यासाठी पुढे यायला हवे. आपला देश महासत्ता बनायचंय दिशेने वाटचाल करीत आहे. त्यासाठी जुन्या नेत्यांच्या अनुभवाच्या फायद्यांसह, तरूणांची उर्जा आणि नवीन विचारदेखील राजकारणात सापडले पाहिजेत.

---

लोकसंसद

## अर्जाची छाननी होईपर्यंत योजना स्थगित करावी !

लोकसभेत मिळालेले अपयश विधानसभेत मिळू नये म्हणून राज्यातील युती सरकारने घिसाडघाईने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लागू केली. इतकेच नव्हे तर दरमहा मिळणारे १५०० रुपये वाढवून ते २१०० करण्याचेही आश्वासन निवडणुकीच्या तोंडावर देण्यात आले. याचा हवा तसा लाभ महायुतीला झाला सुद्धा. राज्याची सत्ता पुन्हा एकदा महायुतीच्या हाती आली. आता मात्र दरमहा १५०० रुपये देणेच सरकारला अवघड झाले आहे. राज्याच्या तिजोरीवर या योजनेचा मोठ्या प्रमाणावर ताण पडू लागला आहे ज्याचा परिणाम अन्य सरकारी योजनांवर होऊ लागला आहे, त्यातच या योजनेअंतर्गत झालेल्या गैरकारभाराची प्रकरणे बाहेर येऊ लागली आहेत. बांगला, चारचाकी गाडी असलेल्या, घरात नोकरचाकर असलेल्या तसेच सरकारी सेवेत असणाऱ्या महिलांनीही या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आली आतातर याच बाबतीत नवीन माहिती समोर आली आहे. योजना सुरु झाल्यापासून राज्यातील सुमारे चौदा हजार तीनशे पुरुष घरातील महिलांच्या नावाने हा सरकारी मलिदा लाटत असल्याची बाब उघड झाली आहे ज्यांच्यावर आजतागायत एकवीस कोटीहून अधिक रक्कम सरकारी तिजोरीतून गेली आहे. अर्जाची जी छाननी ही योजना सुरु होण्याआधी करणे अपेक्षित होते ती आता केली जात आहे परिणामी आजतागायत सरकारचे हजारो कोटी अपात्र लोकांना वाटण्यातच वाया गेले आहे. सामान्य नागरिकांच्या घामाच्या पैशातून कररूपाने सरकार दरबारी जमा झालेल्या पैशाची सरकार सर्रासपणे उधळपट्टी करत आहे. अर्जाची छाननी अद्यापही सुरु असून आणखी काही माहिती भविष्यात उजेडात येण्याची शक्यता असून या योजनेतून जनतेचा किती पैसा वाया गेला त्याचे आणखी काही आकडे येणाऱ्या काळात पाहायला मिळणार आहेत. आधीच जनतेचे कोट्यवधी रुपये अपात्र बहिणींना आणि बहिणींच्या नावाखाली पैसा लाटणाऱ्या पुरुषांना वाटण्यात गेले आहेत. आणखी पैशांचा दुरुपयोग नको व्हायला म्हणून सरकारने अर्जाची नीट आणि पूर्णपणे छाननी होईपर्यंत या योजनेला स्थगिती द्यावी.



**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

---

दिनविशेष

# अण्णाभाऊ साठे- लोकशाहीर यांचा जन्म

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव तुकाराम भाऊराव साठे आहे. हे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. ते मार्क्सवादी-आंबेडकरवादी विचारांचे होते. यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे मांग जातीत झाला त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव आणि आईचे नाव वालबाई होते. जातीय भेदभावामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊंनी दोन विवाह केले. त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे आणि दुसरी पत्नी जयवंता साठे होत्या. त्यांना तीन अपत्ये होती. एका मागासलेल्या जातीत त्यांचा जन्म झाला होता. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी त्यांना उच्च वर्णीयांच्या अपमानास्पद वागणुकीला सामोरे जावे लागले. त्यामुळे शाळेच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी शाळा सोडली. त्यापुढे कधीही न शिकलेल्या अण्णाभाऊ साठेंनी साहित्य आणि लोकसंगीताच्या माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य केले. शाहीर म्हणून परिचित असलेले अण्णाभाऊ साठे यांनी कथा आणि कादंबरी या साहित्यप्रकारातही वेगळा ठसा उमटवला. मराठी भाषेत शाहीर साठे यांनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. १९५९ मध्ये त्यांनी लिहिलेल्या फकिरा या कादंबरीला १९६१ मध्ये राज्य सरकारचा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. तत्कालीन ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांनीही शाहीर साठे यांच्या फकिरा या कादंबरीचे कौतुक केले. शाहीर अण्णाभाऊ साठे लिखित १५ लघु कथासंग्रह विविध भारतीय भाषांमध्ये भाषांतरित करण्यात आलेले आहेत. शाहीर साठे यांनी २१ कथासंग्रह आणि ३० पेक्षा अधिक कादंबऱ्या लिहिल्या. कादंबरी, लघुकथांप्रमाणेच साठे यांनी नाटकं, पटकथा आणि पोवाडा अशा विविध साहित्यप्रकारांतही लेखन केले आहे. विविध साहित्य प्रकार हाताळताना त्यांनी सामान्य कष्टकरी जनतेला जागृत करण्याचे कार्य केले. अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे केवळ भारतातच नाहीत तर परदेशातही गाजले. पोवाड्यांच्या माध्यमातून छत्रपती शिवरायांचे चरित्र शाहीर साठे यांनी रशियापर्यंत पोहोचवले. रशियाच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्षांनीही शाहीर साठे यांचा सन्मान केला. एवढेच नाही तर रशियन भाषेतही पोवाड्यांचे भाषांतर झाले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय प्रश्नांविषयी महाराष्ट्रात त्यांनी मोठी जागृती केली. त्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम या चळवळींमध्ये त्यांनी शाहिरीतून दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. ‘फकिरा’मध्ये अण्णाभाऊ साठे यांनी भीषण दुष्काळात ब्रिटिशांचे खजिने, धान्य लुटून गरिब, तळागाळातील जनतेला वाटप करणाऱ्या फकिरा या पीडित समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण आहे. ‘माकडीचा माळ’ या कादंबरीत त्यांनी भटक्या-विमुक्त समाजाच्या जीवनपद्धतीचे चित्रण केले आहे. तर ‘वैजयंता’ या कादंबरीत तमाशात काम करणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण केले आहे. १९४४ रोजी त्यांनी लाल बावटा पथक स्थापन केले. कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झालेल्या अण्णाभाऊ साठे यांनी डी.एन. गवंकर आणि अमर शेख या लेखकांसोबत १९४४ मध्ये ‘लालबावटा’ कला पथकाची स्थापना केली. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हाने दिली. अण्णाभाऊ साठे यांची ‘माझी मैना’ गावाकडं राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली।। ही लावणी आजही खूप लोकप्रिय आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १६ ऑगस्ट १९४७ रोजी अण्णाभाऊ साठे यांनी मुंबईमध्ये २० हजार लोकांचा मोर्चा काढला. निरक्षर असूनही लोकसाहित्याच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील लोकांना जागृत करण्याचे महान करणाऱ्या शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी १८ जुलै १९६९ रोजी जगाचा निरोप घेतला.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ ऑगस्ट

१) श्री.महादेव रामा भगत मु. खारीक-पाडा, अलिबाग, १-७-१९४०

२)श्री. गजानन धर्मा मढवी चेंढरे-अलिबाग १-७-१९५०

३)अशोक नथू काकडे मु.पिंपळभाट,अलिबाग १-७-१९५६

४)श्री.रामकृपाल नायाक प्रसाद जयस्वाल चेंढरे, अलिबाग १-७-१९५८


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**


**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**तबस्सुम इकबाल मिरकर, काळींजे, श्रीवर्धन**


**तरुण नंदकुमार सक्सेरिया मुंबई**


## सुवर्णकण



ज्यांना नरदेहाचा हेतूच समजलं नाही ते मिळालेल्या संधीचा लाभ कसा उठवणार?

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**



## बिबट्याचा धुमाकूळ

**| खेड | प्रतिनिधी |**

खेडतालुक्यातीलऐनवरेवपरिसरातील सात ते आठ गावांमध्ये गेल्या वर्षभरापासून बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. या बिबट्याने आतापर्यंत ३ सहा शेतकऱ्यांची तब्बल दहा जनावरे भक्षण केली आहेत. मंगळवारी (दि. २९) ऐनवरे गावातील पोलीस पाटील शिवाजी पोफळकर यांच्या बंद वाड्यात घुसून बिबट्याने सहा महिन्यांचे वासरू उचलून नेले. ही घटना भरदिवसा घडल्याने गावकऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. बिबट्याचा वावर ऐनवरे, तिसंगी मोहल्ला, मोहाने, ऐनवली, कुळवंडी, तांबरीची वाडी, गुणदे या गावांमध्ये सातत्याने होत आहे. तो सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळी गावात, रस्त्यांवर आणि बंदिस्त वाड्यांमध्ये शिरतो. ग्रामस्थांनी या संदर्भात वनविभागाने तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी ऐनवरे गावचे दिनेश पोफळकर यांनी केली आहे.

# खैराच्या झाडांची बेसुमार कत्तल

## ●कारवाई करण्यास वनविभागाला अपयश

**| पालघर | प्रतिनिधी |**

**पालघर तालुक्यातील वांद्री धरण परिसरातील जंगलात मौल्यवान खैर जातीच्या झाडांची बेकायदा बेसुमार कत्तल करून तस्करी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. खैरांची कत्तल आणि चोरटी वाहतूक करणाऱ्या तस्करांवर कारवाई करण्यास डहाणू वनविभाग आणि वनविकास महामंडळाला अपयश येत आहे.**



डहाणू वनविभाग अंतर्गत भाताणे आणि दहिसर तर्फे मनोर वनपरिक्षेत्रातील वांद्री धरण परिसरातील जायशेत, बहिरीफोंडा, गांजे, टकमक किल्ल्याच्या जंगलातून २०० पेक्षा अधिक मौल्यवान खैर जातीच्या झाडांची तस्करांकडून बेकायदा कत्तल आणि तस्करी करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. अनेक दिवसांपासूनगटक्रमांक१४९,१५४, १५५, १५६. १५७, १५८ मधून खैरांची कत्तल करून तस्करी करण्यात येत आहे. वांद्री धरण परिसरातील जंगल हे पावसाळ्यात अधिकच दुर्गम व घनदाट होत असल्याने या भागात पायी गस्त घालण्याकडे वनविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्याचे दूर्लक्ष होते. त्यातच भाताणे आणि दहिसर वनपरिक्षेत्रात पूर्वी स्थानिक गावातील वनमजुरांकडून दुर्गम जंगलात दिवस रात्र पायी गस्त घालून जंगलतोडीवर अंकुश घालून सुरक्षा केली जात होती. मात्र गेले वर्षभरापासून वनमजूर म्हणून काम करणाऱ्या ३० स्थानिक तरुणांना वनविभागाने कामावरून कमी केल्याने दुर्गम जंगलात नियमित पायी गस्त घालण्याचे काम थांबले आहे.

सध्या वन कर्मचाऱ्याकडून नियमितपणे गस्त घातली जात नसल्याने तस्करी करणाऱ्याकडून याचाच फायदा घेऊन बेसुमार खैरतोड केली जात आहे. जायशेत व बहिरीफोंडा परिसरात जाण्यासाठी वांद्री धरणाजवळून एकमेव गाडी रस्ता असून या ठिकाणी तपासणी चौकी आहे. या परिसरात जाण्यासाठी बाहेरील पर्यटक आणि वाहने यांची कसून तपासणी केली जाते. मात्र खैराची मोठ्या प्रमाणात होणारी तस्करी रोखण्यासाठी संबंधित वनपरीक्षेत्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अपयश येत आहे.

> **मागील आठवड्यात वनविभाग डहाणू आणि वनविकास महामंडळ यांनी संयुक्त कारवाई करीत खैराचे ओंडके जप्त करण्याची कारवाई केली आहे. वनपरिक्षेत्र दहिसर, भाताने आणि वनविकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून जंगल परिसरात नियमित गस्त घातली जाते.**
> **– निरंजन दिवाकर, उपवन संरक्षक, वनविभाग डहाणू**

# स्मार्ट मीटर्सचा ग्राहकांना शॉक

**| ठाणे | प्रतिनिधी |**



## ● मासिक भाड्यापेक्षा जास्त वीजबिल

डोंबिवलीमधील पलावा टाऊनशिपमधील ३०० हून अधिक रहिवाशांना, गेल्या अनेक महिन्यांपासून मासिक भाड्यापेक्षा जास्त वीजबिल येत आहे. या बिलाची रक्कम त्यांच्या फ्लॅटसाठी भरलेल्या गृहकर्जाच्या हप्त्यापेक्षा जास्त आहे. मार्चपूर्वी ज्यांना २ बीएचके फ्लॅटसाठी दरमहा २००० ते २५०० रुपये वीज देय होती. त्यांना आता गेल्या चार महिन्यांपासून १५ हजार ते ३० हजारापर्यंतची बिल येत आहेत.

रहिवाशांचा आरोप आहे की, जुन्या मीटरचे स्मार्ट मीटरमध्ये बदल केल्यामुळे हे घडले आहे. एका रहिवाशाने महावितरणच्या अधिकाऱ्याशी संपर्क साधला असता अधिकाऱ्याने सांगितले की, मीटर रीडिंग गोळा करणाऱ्या व्यक्तीची अनुपलब्धता हे त्याचे कारण आहे. ती व्यक्ती ड्युटीवर हजर झालेली नाही, त्यामुळे गेल्या चार महिन्यांपासून प्रत्यक्ष मीटर रीडिंग घेतले गेले नाही. बदली व्यक्ती शोधत आहोत, परंतु तोपर्यंत सरासरी रीडिंग दिले जात आहे. तर उन्हाळ्यात जास्त वीज वापरामुळे काही मीटर रीडिंग खरे असल्याचा दावाही महावितरणचे अधिकारी करत आहेत.

# खड्ड्याने घेतला तरुणाचा बळी

## स्थानिक रहिवासी आक्रमक

**| ठाणे | प्रतिनिधी |**




भिवंडी-वाडा रस्त्यावरील खड्ड्याने एका तरुणाचा बळी घेतला आहे. ही झाल्याची घटना बुधवारी (दि. ३०) उघडकीस आली. हा अपघात २० जुलै रोजी झाला होता, परंतु बुधवारी यश याचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. यश याच्या मृत्यूनंतर स्थानिक रहिवासी आक्रमक झाले. यश मोरे असे या मुलाचे नाव असून याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते आणि कंत्राटदारावर गुन्हा दाखल झाला आहे.

भिवंडी येथील मडक्याचा पाडा परिसरात यश मोरे हा राहत होता. २० जुलैला तो त्याच्या मित्रासह दुचाकीने व्यायामशाळेत जात असताना त्याची दुचाकी खड्ड्यांमध्ये आदळली. या घटनेत यश आणि त्याचा मित्र गंभीर जखमी झाले. दोघांना ठाण्यातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अखेर बुधवारी सकाळी यश मोरे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या घटनेची माहिती स्थानिकांना मिळाल्यानंतर स्थानिक आक्रमक झाले. यश याच्या कुटुंबीयांनी आणि स्थानिकांनी रस्त्यावर उतरत आंदोलन सुरू केले. तर अपघातात जबाबदार असलेले कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल होत नाही तोपर्यंत आम्ही मृतदेह अंत्यसंस्कारासाठी ताब्यात घेणार नाहीत असा पवित्रा यशच्या नातेवाईकांनी घेतला होता.

घटनेची माहिती मिळताच भिवंडी तालुका पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलनकर्त्यांची समजूत काढून गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिले. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात कंत्राटदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# स्मशानशेडचे काम रखडले

**| चिपळूण | प्रतिनिधी |**



**४ लाखांचा खर्च करूनही उघड्यावर अंत्यसंस्कार**

रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत जनसुविधा योजनेतून चिपळूण तालुक्यातील कळंबट ग्रामदेवता देवरहाटी परिसरात ३,९९,९६८ रूपये खर्च करून स्मशानशेड उभारण्याचे काम जानेवारी २०२५ मध्ये सुरू झाले. प्रारंभी ग्रामस्थांच्या आशा उंचावल्या; मात्र सात महिने उलटूनही हे काम अर्धवट अवस्थेत आहे. विशेष म्हणजे, कंत्राटदाराला कामाच्या एक तृतीयांशहून अधिक रक्कम आगाऊ अदा करण्यात आली आहे. दरम्यान पावसाळा सुरू झाला आणि अपूर्ण स्मशानशेडचे वास्तव समोर आले आहे.


स्मशानशेडच्या शेजारील मोकळ्या जागेत चिखल, गटारे आणि पावसात अंत्यविधी करावे लागत आहे. ही स्थिती गावकऱ्यांना मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या व्यथित करणारी आहे. उभ्या स्मशानशेडच्या शेजारीच ही दुर्दशा घडते आहे. स्मशानशेड ही केवळ भौतिक सुविधा नसून मरणोत्तर सन्मानाची बाब असते. मात्र प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ही गरजही अपूर्ण राहिली आहे. अशा संवेदनशील कामात प्रशासनाची उदासीनता आणि जबाबदारीची टाळाटाळ ग्रामीण भागातील विकास नावाच्या संकल्पनेचा कटू वास्तव प्रतिबिंबित होतो.

## राजपुरी येथे वृक्षलागवड

**मुंबई :** मुरूड आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी येथील माझेरी व डोंगरी भागात सुमारे ५०० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली आहे. यामध्ये फणस, जांभूळ, रामफळ, सीताफळ, चिंच, आवळा, वड आदी उपयुक्त वृक्ष लावण्यात आले. यावेळी मुंबईमधील आर्ट ऑफ लिव्हिंगच्या शिक्षिका पल्लवी पाटील, मुरूड शहरातील आर्ट ऑफ लिव्हिंगच्या शिक्षिका सुस्मिता गुरव, हसमुख जैन, सुनील गुरव, मंगेश पाटील, शेडगे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फुणगुस येथे ट्रक दरीत कोसळला

**| संगमेश्वर | प्रतिनिधी |**



**● गुगल मॅपमुळे पुन्हा घात**
**● १५ दिवसात घडला तिसरा अपघात**

संगमेश्वर तालुक्यातील फुणगुस येथील अवघड वळणावर पुन्हा त्याच ठिकाणी गुरुवारी (दि. ३१) सकाळी १० वाजता दुसरा अपघात झाला आहे. गोव्याहून वसईकडे जाताना गुगल मॅपद्वारे फुणगुसमार्गे हा ट्रक जात होता. फुणगुस येथील अवघड वळणावर चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने हा अपघात झाला आहे. सुदैवाने चालकाने गाडीतून उडी मारल्यामुळे तो बचावला आहे. १५ दिवसातील हा तिसरा अपघात आहे.

पार्लेजी पेपर रॅपिंग रोल घेऊन ट्रक गोव्याहून वसईकडे जात होता. यामध्ये सात टन माल होता. फुणगुस येथील अवघड वळणावर चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि ट्रक थेट ४० फूट खोल दरीत कोसळला. यावेळी चालकाने गाडीतून उडी मारल्याने तो थोडक्यात बचावला आहे. याच ठिकाणी १२ दिवसांपूर्वी कार दरीत कोसळली होती. त्यानंतर दोन दिवसापूर्वी आयशर टेम्पो कोसळला होता. त्यानंतर गुरुवारी पुन्हा ट्रक दरीत कोसळून मोठे नुकसान झाले आहे.

# नोकरीचे आमिष दाखवून लाखोंची फसवणूक

**| नाशिक | प्रतिनिधी |**

शासकीय विभागात कनिष्ठ अभियंत्यापदी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून तब्बल चार लाखांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भारती प्रमोद कुमावत, स्वप्नील रामदास परदेशी अशी दोघा संशयितांची नावे आहेत.

ज्योती लक्ष्मीकांत गायकवाड (४४, रा. तुळजाभवानी नगर, पाथर्डी शिवार, इंदिरानगर) यांच्या फिर्यादीनुसार, त्यांचा मुलगा रितेश हा सिव्हिल इंजिनिअर आहे. संशयित भारती कुमावत ही त्याची वर्गमैत्रीण आहे. तिनेच संशयित स्वप्नील हा सरकारी नोकरी लावून देतो म्हणून गायकवाड यांना सांगत स्वप्नीलशी बोलणे करून दिले. त्यावेळी संशयितांनी चार लाख रुपयांची मागणी केली होती. त्यानुसार, ऑक्टोबर २०२४ पर्यंत संशयितांना ३ लाख ९९ हजार ३४१ रुपये देण्यात आले. परंतु, बरेच महिने होऊनही नोकरी न मिळाल्याने त्यांनी विचारपूस केली असता संशयितांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. फसवणूक झाल्याचे लक्षात आले असता त्यांनी इंदिरानगर पोलिसात तक्रार केली.

## घरगुती वादातून भावाची हत्या

**| नागपूर | प्रतिनिधी |**

चंद्रपूर शहरातील बायपास रोडवरील जुनोना चौक परिसरात बंदुकीने गोळी मारून एका तरुणाने त्याच्या मोठ्या भावाची हत्या केल्याची घटना घडली. घरगुती कारणावरून हत्या करण्यात आली. मृतकाचे नाव बुद्धा सिंह टाक(४५) आहे. तर आरोपीचे नाव सोनू सिंह टाक (३०) आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले. आरोपी सोनू सिंग घटनास्थळावरून फरार झाला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहे.

# कचरा संकलन केंद्र उभारणार

**| सोलापूर | प्रतिनिधी |**

सोलापूर महापालिकेला स्वच्छ भारत मिशन दोन अंतर्गत १८ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. यातून शहरात हैदराबाद रोड आणि सिव्हिल येथील पीएचई सेंटर या दोन ठिकाणी कचरा संकलन केंद्र आणि भोगाव कचरा डेपो येथे एसएलएफ (सॅनिटरी लॅण्ड फिल प्रकल्प) उभारण्यात येणार आहे.

महापालिकेला स्वच्छ भारत मिशन एक अंतर्गत २५ कोटींचा निधी प्राप्त झाला. त्यातून शहरातील रस्त्यांच्या स्वच्छतेसाठी स्वीपर मशिनचा मक्ता देण्यात आला. बायोमायनिंग प्रकल्पावर खर्च करण्यात आला. तर स्मार्ट सिटी योजनेतून शहरात चार इंद्रधनू इमारत, रूपाभवानी, जुळे सोलापूर एचएसआर टाकी आणि लेप्रसी कॉलनी परिसरात असे चार ठिकाणी ट्रान्स्फर्स्टेशन कचरा संकलन केंद्रे आहेत. आता नव्याने दोन केंद्राची भर पडणार असून, आता स्वच्छ भारत मिशन एक अंतर्गत प्रत्येकी ४ कोटी रुपये खर्चून हैदराबाद रोड आणि सिव्हिल येथील पीएचई सेंटर या दोन ठिकाणी ट्रान्स्फर्स्टेशन (कचरा संकलन केंद्र) उभारली जाणार आहेत. तसेच न कुजणारा कचऱ्यातून पर्यावरणाला हानी पोहोचू नये, याकरिता शास्त्रोक्त पद्धतीने भूगर्भात कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी सॅनिटरी लॅण्ड फिल प्रकल्प भोगाव कचरा डेपो येथे उभारला जाणार आहे. प्रकल्प उभारणीसाठी बायोएनर्जी प्रकल्पाला पाच एकर जागा भाडेतत्वावर दिली जाणार आहे. जागा भाडेतत्वावर देण्याला महापालिकेने मंजुरीही दिली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार या कामांना गती मिळणार आहे.

## टायरचोर अटकेत

**पुणे :** टायर विक्री करणाऱ्या दुकानांचे दरवाजे उचकटून टायर चोरणाऱ्या सराईत चोरट्याला काळेपडळ पोलिसांनी अटक केली. परवेझ लियाकत काझी (वय ४५, रा. सय्यदनगर, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून तीन लाख ५३ हजाररुपयांचेटायरजप्तकरण्यातआले आहेत. काझी याने हडपसरमधील काळेपडळ, लष्कर आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत टायर विक्री करणाऱ्या दुकानांमध्ये चोरी केल्याचे तपासात समोर आले आहे. तो रात्रीच्या वेळेस दुकाने बंद असताना दरवाजा उचकटून टायर चोरून रिक्षात टाकून पसार होत असे.

# भाजीपाला उत्पादक हवालदिल

**| नाशिक | प्रतिनिधी |**

सततच्या पावसाने झालेले नुकसान आणि मागणीअभावी कोसळलेल्या बाजारभावामुळे जिल्ह्यातील भाजीपाला उत्पादक हवालदिल आहेत. कोथिंबीर, लिंबू, डांगराला मातीमोल दर पुकारला जात असून, त्यातून साधा वाहतूक खर्चही सुटत नसल्याने शेतकरी शेतमाल नाशिक बाजार समिती आवारात फेकून घरचा रस्ता धरत आहेत.

मे महिन्यापासून जिल्ह्यात पाऊस धुमाकूळ घालत आहे. त्यामुळे शेतातच पालेभाज्या, फळभाज्या खराब होण्याचे प्रमाण वाढल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला.



नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीत नाशिकसह दिंडोरी, निफाड, सिन्नर, त्र्यंबकेश्वर तालुक्यातून मोठ्या प्रमाणात भाज्या येत आहेत. येथून मुंबई आणि गुजरातच्या अहमदाबादला त्याचा पुरवठा होतो, परंतु सध्या गुजरातसह इतर राज्यांतही स्थानिक उत्पादन अधिक असल्याने आपल्याकडील मालाला तितकासा उठाव नाही. स्थानिक बाजारातही मागणी घटल्याने दरावर परिणाम झाला आहे.

कोथिंबीर, लिंबू, डांगराला मातीमोल दर पुकारला जात असून, त्यातून साधा वाहतूक खर्चही सुटत नसल्याने शेतकरी शेतमाल नाशिक बाजार समिती आवारात फेकून घरचा रस्ता धरत आहेत. मागील महिन्यात कोथिंबिरीची प्रतिजुडी किमान १०, सरासरी ४०, कमाल ५८ रुपयाला विक्री होत होती, तिची आवक आता सवा लाख जुड्यांवर पोहोचल्याने दर निम्म्यावर आले आहेत. येथे मंगळवारी किमान ५, सरासरी २५ दर मिळाला. व्यापारी प्रतिजुडी १ ते २ रुपये असा मातीमोल भाव देऊ करत असल्याने काही शेतकऱ्यांनी ती विकण्याऐवजी फेकून दिली.

# बीएएमएस डॉक्टर पगाराच्या प्रतीक्षेत

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

रत्नागिरी जिल्ह्यातील ६७ प्राथमिक आरोग्य केंद्रात १०६ कंत्राटी डॉक्टर आहेत. या डॉक्टरांना चार महिने पगार मिळालेला नाही. पगाराविना कंत्राटी डॉक्टरांचे आर्थिक आरोग्य बिघडले आहे. रत्नागिरी जिल्ह्यात एमबीबीएस डॉक्टरांची १३३ पदे मंजूर असून सध्या फक्त २३ एमबीबीएस डॉक्टर कार्यरत आहेत.

जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा कंत्राटी डॉक्टरांवर अवलंबून आहे. ६७ प्राथमिक आरोग्य केंद्राची जबाबदारी बीएएमएस डॉक्टरांवर आहे. जिल्ह्यात १०६ बीएएमएस डॉक्टरांची दरमहा चाळीस हजार रुपये मानधनावर कंत्राटी नेमणूक करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेची भिस्त या एमबीबीएस डॉक्टरांवर टाकण्यात आली आहे.

मात्र, हे कंत्राटी डॉक्टर सेवेत रुजू झाल्यापासून त्यांना कधीही वेळेत पगार दिला नाही. जुलै महिन्यासह १०६ कंत्राटी डॉक्टरांना चार महिने पगार मिळालेला नाही. त्यामुळे डॉक्टरांची आर्थिक गणिते कोलमडली आहेत. कर्जाचा भार डोक्यावर असलेल्यांनी बँकाचे हफ्ते वेळेत कसे भरायचे? मुलांच्या शिक्षणाचा खर्च वेळेत कसा भागवायचा? हे प्रश्न या कंत्राटी डॉक्टरांसमोर भेडसावत आहेत.

## एसटी महामंडळाची कोट्यवधींची होणार बचत | परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचा पुढाकार

# डिझेल इंधनावरील सवलत दरात वाढ

**| मुंबई | प्रतिनिधी |**

**परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दाखवलेला व्यवसायिक दृष्टिकोन आणि योग्यवेळी घेतलेल्या कणखर भूमिकेमुळे एसटी महामंडळाची दरवर्षी तब्बल १२ कोटी रुपयांची बचत होणार आहे.**

येत्या १ ऑगस्टपासून इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या कंपन्यांनी एसटी महामंडळाला पुरवण्यात येणाऱ्या डिझेल इंधनावरील देण्यात येणाऱ्या सवलत दरात प्रति लिटर ३० पैशांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे दिवसाला सरासरी तीन लाख २३ हजार रुपये याप्रमाणे वर्षाला अंदाजे ११ कोटी ८० लाख रुपये इतकी बचत होणार आहे.




गेली ७० वर्षापेक्षा अधिक काळ एसटी महामंडळ इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्याकडून डिझेल इंधन खरेदी करत आहे. सध्या दररोज एसटी महामंडळाला सरासरी १० कोटी ७८ लाख लिटर डिझेल लागते. एसटी महामंडळ हे या कंपन्यांचा मोठा खरेदी ग्राहक असल्यामुळे संबंधित कंपन्या महामंडळाला प्रति लिटर सवलत देत होत्या. परंतु एसटी महामंडळाने वारंवार विनंती करूनही कित्येक वर्ष या कंपन्यांनी सवलत दरात बदल केला नव्हता. तथापि, परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी याबाबत सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे संबंधित कंपन्यांनी सवलत दरामध्ये मध्ये वाढ करण्याची भूमिका घेतली. त्यासाठी इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात तीन-चार बैठका घेण्यात आल्या. तसेच डिझेल इंधन पुरवठा करणाऱ्या इतर खाजगी कंपन्या सोबत देखील वाटाघाटी करण्यात आल्या. एवढेच नव्हे तर स्पर्धात्मक स्तरावर निविदा काढण्याची प्रक्रिया देखील राबवण्याची तयारी ठेवली.

संबंधित कंपन्यांनी सवलत दरात वाढ करण्याची तयारी दर्शवली. त्यानुसार येत्या १ ऑगस्टपासून मूळ सवलत दरात प्रति लिटर ३० पैसे वाढ करण्याचे संबंधित कंपन्यांनी मान्य केले आहे. सध्या एसटीच्या २५१ आगारात असलेल्या पेट्रोल पंपाच्या सहाय्याने दररोज सरासरी १० कोटी ७८ लाख लिटर डिझेल इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या कडून पुरविण्यात येते. भविष्यात वाढत्या बसेसच्या संख्येमुळे डिझेल इंधनाची खपत देखील वाढणार आहे. त्यामुळे प्रति लिटर ३० पैसे वाढीव सवलत दिल्यामुळे वर्षाकाठी एसटी महामंडळाची अंदाजे १२ कोटी रुपयांची अतिरिक्त बचत होणार आहे.

> एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आहे. अशा परिस्थितीमध्ये ज्या, ज्या ठिकाणी पैशाची बचत आणि काटकसर करणे शक्य आहे, त्या त्या ठिकाणी बचत आणि काटकसर केली पाहिजे! तसेच तिकीट विक्रीच्या व्यतिरिक्त उत्पन्नाचे इतर स्त्रोत देखील निर्माण करणे गरजेचे आहे. अर्थात, या दोन्ही प्रयत्नातून भविष्यात एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल.
> – प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री

## निवडक

### वेदक कॉलेजमध्ये अन्न भेसळ जनजागृती




**तळा :** जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा व द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा यांच्या संयुक्त विद्यमाने अन्नभेसळ जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे आयोजन रसायनशास्त्र विभाग, जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्सच्या प्रयोगशाळेत करण्यात आले होते. हा कार्यक्रम खासकरून तळा तालुक्यातील महिलांसाठी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर स्वरूपात राबविण्यात आला. यावेळी डॉ. फयाज पठाण, सहाय्यक प्राध्यापक, स्कूल ऑफ फूड टेक्नॉलॉजी, एमआयटी विद्यापीठ पुणे यांनी उपस्थितांना अन्न भेसळ ओळखण्याच्या पद्धती, त्याचे दुष्परिणाम, तसेच अन्न प्रशासनाद्वारे घेतल्या जाणाऱ्या उपाययोजना याविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी अन्नभेसळीचे प्रकार, त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम, भेसळ कशी ओळखावी, घरगुती चाचण्यांची पद्धत आणि कायदेशीर प्रक्रिया याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी त्यांनी दुधात, चहापत्ती, हळद, मध इत्यादी पदार्थांमध्ये होणारी भेसळ प्रात्यक्षिक स्वरूपात दाखवली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्या डॉ. शाहीना मिर्झा यांनी केले. याप्रसंगी पुरुषोत्तम मुळे, रसायनशास्त्र विभागप्रमुख जयदीप देवरे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. विवेक राणे उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी तळा परिसरातील महिला व महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### माथेरानमध्ये खेळांचे आयोजन




**माथेरान :** नागपंचमी सणाचे औचित्य साधून येथील महिलांच्या मैत्री गृपच्या माध्यमातून विविध खेळांचे आयोजन करण्यात आले त्यास असंख्य महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. मंगळवार (दि.२९) रोजी कम्युनिटी सेंटर याठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या खेळांमध्ये विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे त्याचप्रमाणे 'लकी ड्रॉ' ही स्पर्धा घेण्यात आली यामध्ये विजेत्यांना पैठणी देण्यात आली. यामध्ये पैठणी विजेत्या अर्चना बिरामणे, लक्ष्मी सपकाळ, जागृती शिंदे मानकरी ठरल्या. दरवेळी या मैत्री ग्रुपच्या माध्यमातून नवनवीन कार्यक्रम आयोजित केले जातात. शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमात तसेच समाजोपयोगी कामे करण्यात या ग्रुपचा नेहमीच पुढाकार राहिला आहे. या कार्यक्रमासाठी वर्षा शिंदे, सुहासिनी दाभेकर, रचना सावंत, सोनम दाभेकर, वनिता दिघे तसेच सर्व महिलांनी विशेष परिश्रम घेतले.

### कोलाडमध्ये सापांविषयी जनजागृती



**कोलाड :** सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था व महसूल विभाग रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन व सर्प विज्ञान या विषयावर गोवे गावातील नागरिकांना प्रशिक्षण व सापां विषयी जनजागृती मंगळवार (दि.२९) जुलै रोजी करण्यात आली. यावेळी सापांना मारण्यापेक्षा जिवदान द्या. साप हा शेतकऱ्यांचा मित्र आहे, असे सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थाचे अध्यक्ष सागर दहिंबेकर यांनी सांगितले. यावेळी सागर दहिंबेकर, प्रयाग बामुगडे, विशाल जाधव, श्वेता विश्वकर्मा, शशांक दोडामणी, अजय भोकटे, विक्रांत कोंगले, भरत मालुसरे, यश वारकर, सोहम जवके, प्रणय शिंदे, देवेन रटाटे, यांच्या सह गोवे ग्रामस्थ, महिला वर्ग, तरुण वर्ग तसेच विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **पांढरे डाग करा मुळापासून नष्ट :** औषधामध्ये आहे याचा परिणाम या औषधाचा करा वापर पांढरे डागापासून मिळवा मुक्ती. संपर्क : ८९६९१३५३८९ यावर कॉल करा. घरीबसल्या औषध मिळवा.
- **भारत पेट्रोल पंप चेंढरे अलिबाग बायपास येथे** ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. शिक्षण - B.Com ७४४७४०४४३८/७४४७४०४४११
- Fresh graduates required for the post of office staff in Alibag. For interview call 9923750539, 9422383099
- Office च्या कामासाठी मुलगी पाहिजे. पात्रता B.com typing मराठी english, tally ms office. No. 9823173508 शिंदे हॉस्पिटल, अलिबाग
- **अलिबाग येथील ऑफिस कामाकरीता** इंग्लिश व मराठी टायपिंग येणारी टायपिस्ट पाहिजे. मो.नं. ९१४६६२४५१० वेळ सकाळी १० ते ६
- **अलिबागमध्ये ब्युटी पार्लर कामासाठी** अनुभवी मुले, मुली पाहिजे. मो. ८१४९८६५६५५
- **ऑफीसमध्ये कामाला मुलगी पाहिजे.** पात्रता Bsc, आणि कॉम्प्यूटरची माहिती, वेळ : सकाळी ९ ते सायं. ६-३०, ठिकाण बामणसुरे, चोंढी, पगार : १०,००० महिना, रविवारी सुट्टी. संपर्क :९८२३५८५३२१
- **ड्रायव्हर पाहिजे.** ऑटोमॅटीक कार ड्रायव्हिंग येणारा ड्रायव्हर पाहिजे, ठिकाण : बामणसुरे, चोंढी. रविवारी सुट्टी. संपर्क :९०४९६५५५२३
- **दुकान गाळा विक्री करणे आहे.** अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ, संपर्क : ९७६४५४८६७९

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# कंपनीच्या प्रदूषणामुळे ताकईकर हैराण



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

साजगाव गावातील युनिवर्सल इस्टेटमधील केमिकल्स उत्पादन करणारी फिनोझॉल स्पेशालिटी केमिकल्स प्रा. ली. आहे. या कारखान्यात ज्वलनशील केमिकल्सच्या प्रदूषणामुळे ताकई गावातील नागरिकांना अनेक दिवसांपासून त्रास होत आहे. शुक्रवार (दि.२५) जुलै रोजी रात्रीच्यावेळी मोठ्या प्रमाणात प्रदुषणामुळे त्रास झाल्यामुळे ताकई गावातील तरूणांनी कंपनी व्यवस्थापनाकडे तक्रार केली असता सदर तक्रारीची दखल घेण्याचे अश्वासन कंपनीने दिले. यासंबंधीचे निवेदन खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक सचिन हिरे यांच्याकडे दिले असून प्रदुषण मंडळाकडे तक्रार करणार असल्याचे माजी नगराध्यक्ष डॉ. सुनिल पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

> फिनोझॉल स्पेशालिटी केमिकल्स कंपनीतील प्रदुषणामुळे अनेक दिवसांपासून त्रास होत आहे. परंतु, शुक्रवारी संध्याकाळी उग्रवासामुळे गुदमरल्यासारखे झाले. डोळ्यांना जळजळ झाली. काहींना उलट्या झाल्याची घटना घडली आहे. नगरपालिकेची प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांना प्रचंड त्रास झाला आहे.
> –संदेश पाटील
> स्थानिक ग्रामस्थ ताकई

साजगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अनेक केमिकल्स कंपन्यामधील प्रदूषित सांडपाणी मोकळ्या जागेत सोडले जाते तसेच जमिनीत मुरते, त्यामुळे बोरवेलचे पाणीही प्रदूषित झाले आहे. साजगाव गावच्या बाजूलाच खोपोली नगरपालिका हद्दीतील ताकई गावा आहे. फिनोझॉल स्पेशालिटी केमिकल्स कंपनीमधील धुराची चिमणी ताकई गावाकडे आहे, तीची उंची कमी असल्यामुळे केमिकल्सच्या उग्र वासामुळे गुदमरल्यासारखे होते, डोळ्यांना जळजळ होत आहे, उलट्या होतात. नगरपालिकेची प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांना आणि गावातील नागरिकांना त्रास होत आहे.

साजगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अनेक केमिकल्स कंपन्यामधील प्रदूषित सांडपाणी मोकळ्या जागेत सोडले जाते तसेच जमिनीत मुरते, त्यामुळे बोरवेलचे पाणीही प्रदूषित झाले आहे. कंपनी परिसरात वृक्षलागवड नाही, अनाधिकृत बांधकाम केले आहे, याविरोधात पर्यावरणप्रेमी तसेच स्थानिक ग्रामस्थ मनिष खवळे तब्बल बारा वर्षापासून कारवाईसाठी पत्रव्यवहार करीत आहेत. परंतु संबंधित विभागाकडून त्यांच्या पत्राला केराची टोपली दाखवत कंपन्यांना अभय दिला जात असल्याने लोकशाही दिन सुनावणीत मनिष खवळे यांनी तक्रार मांडत स्थळ पहाणी करीत पाण्याचे नमुने तपासा अशी तक्रार केल्यानंतर तहसिलदार अभय चव्हाण यांनी प्रदुषण मंडळ, आरोग्य विभाग आणि महसुल विभागाची टिम पाठवली होती, अजूनही त्यांना न्याय मिळाला नाही.

> कंपनीतील प्रदुषणामुळे अनेक दिवसांपासून त्रास होत आहे. परंतु शुक्रवारी संध्याकाळी उग्रवासामुळे त्रास झाला आहे. यासंबंधीची तक्रार खोपोली पोलीस ठाण्यात केली आहे, प्रदुषण मंडळाकडे तक्रार करणार आहोत.
> –संदेश पाटील, स्थानिक ग्रामस्थ ताकई

ताकई गावातील तरूणांनी कंपनीच्या विरोधात खोपोली पोलीस ठाण्यात पोलीस निरिक्षक सचिन हिरे यांच्याकडे निवेदन दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ. सुनिल पाटील, संदेश पाटील, चंद्रशेखर पाटील, संजय पाटील, राकेश पाटील, मंदार पाटील, युगल पाटील, हितेन पाटील, समिती पाटील यांच्यासह गावातील तरूण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



● भात लावणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. या कामांसाठी पारंपारिक बैलांच्या मदतीने नांगरणीचे काम करताना दिसत आहे.

## संस्थांनी प्रस्ताव सादर करावेत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्याच्या सहकार चळवळीमध्ये उत्कृष्ट योगदान दिलेल्या राज्यातील सहकारी संस्थांना शासनामार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या इच्छूक सहकारी संस्थांनी आपला प्रस्ताव १८ ऑगस्टपर्यंत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप यांनी केले आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर सहकार महर्षी पुरस्कार -१, सहकार भुषण पुरस्कार -२१ व सहकार निष्ठ पुरस्कार २३ याप्रमाणे सहकार पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यात येणार आहे. सर्व सहकारी संस्थांच्या पुरस्कारासाठीचे निकष व गुणांचा तपशिल याची सविस्तर माहीती सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर तसेच कार्यालयात उपलब्ध असल्याची माहीती देण्यात आली.

## अतुरता आगमनाची...



● गणरायाच्या आगमनाचा वेध सर्व गणेशभक्तांना लागले आहेत. पनवेल येथील मूर्तिकार श्रींच्या रूपाला वस्त्रालंकारांनी सजवताना दिसत आहेत. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## शुभांगी रसाळ यांच्यावर कारवाई

**। पाली । प्रतिनिधी ।**

आरोग्य सेवा मुंबई मंडळ ठाणे येथील उपसंचालक कार्यालयातील वरिष्ठ लिपिक शुभांगी रसाळ यांना पदोन्नती होऊन एक वर्ष व्हायला आले आहे. तरी त्या आपल्या मूळ पदस्थापनेवर रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथील जसवली ग्रामीण रुग्णालयामध्ये हजर झालेल्या नाहीत. त्यांनी आपली पदोन्नती सुद्धा नाकारली नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी बहुजन विद्यार्थी संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अनिल वाणी यांनी लेखी निवेदनाद्वारे राज्याचे आरोग्य विभागाचे सचिव विपुण विनायक यांच्याकडे केली होती. यावर अवरसचिव डॉ. श्वेता सावदेकर यांनी कारवाई करण्याचे आदेश काढले असल्याने उपसंचालक कार्यालयात घबराट पसरली आहे.

रसाळ यांची सहाय्यक अधीक्षक म्हणून पदोन्नती होऊनही त्या आपल्या मूळ पदस्थापनेवर हजर व्हायला तयार नाहीत. तसेच त्यांनी आपली पदोन्नती नाकारली सुद्धा नाही. तसेच शहरी भागातील ३० टक्के एच. आर. ए. मिळविण्यासाठी आणि ग्रामीण भागात काम करायला नको म्हणून त्या जसवली येथे हजर झाल्याच नाहीत.

बहुजन विद्यार्थी संघटनेने हा सारा प्रकार उघडकीस आणून राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या निदर्शनास आणून दिल्याने राज्याच्या आरोग्य विभागाच्या सचिवांना याची दखल घ्यावी लागली. त्यामुळे रसाळ यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश अवर सचिवांना काढावे लागले आहेत. रसाळ यांना उपसंचालक कार्यालयातील मुख्य प्रशासक अधिकारी शैलेश पाटणकर हे पाठीशी घालत असून तेच त्यांना कार्यमुक्त करीत नसून वर्षभर त्यांची पाठराखण करीत आहेत. नियमाप्रमाणे पदोन्नती झालेल्या ठिकाणी पंधरा दिवसाच्या आत उमेदवाराने हजर राहायचे असते तसे झाली नाही तर त्याची पदोन्नती रद्द होते. परंतु रसाळ यांना वर्षभर कार्यमुक्त न करून उपसंचालक कार्यालयाने शासनाच्या नियमांची पायमल्ली केली असून पाटणकर रसाळ यांच्या पदोन्नती आदेशामध्ये अंशता बदल करून पुन्हा उपसंचालक कार्यालयातच रिक्त जागेवर पदस्थापना करायची आहे. मात्र, उपसंचालक डॉ. नांदापूरकर रसाळ यांना कार्यमुक्त करतात की नाही याकडे संपूर्ण आरोग्य विभागाचे लक्ष लागून राहिलेले आहे.

## गणपती विसर्जन रॅम्पची दुरवस्था

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

तत्कालीन जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारा व समुद्र किनारा सुशोभिकरण कामाचा लोकार्पण सोहळा २०१२ साली झाला होता. धूप प्रतिबंधक बंधारा व सुशोभिकरण करते वेळी मठाचा गवंड,शासकीय विश्रामगृह येथून किनार्याकडे जाणारा मार्ग व दांडा विभागात गणपती विसर्जन करीता रॅम्प करण्यात आले होते. गेल्या काही दिवसात समुद्राच्या उधाणाने मठाचा गवंड येथील गणपती विसर्जन रॅम्पची दुरावस्था झाली आहे.



३ डिसेंबर २०२३ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत श्रीवर्धन येथील समुद्र किनाऱ्याच्या सुशोभीकरण कामांचा लोकार्पण संपन्न झाला होता. यावेळेस ही गणपती विसर्जन रॅम्पचे नूतनीकरण करण्यात आले होते.कोट्यावधीं च्या उलाढालीत रॅम्प च्या बांधकामात अनेक त्रुटी राहिल्याचे दिसून येते. उधाणाच्या तडाख्याने रॅम्प खालील दगड वाहून गेलेत तर रॅम्प चा स्लॅब कोसळल्याने लोखंडी शिघा बाहेर आल्या आहेत.दगडं वाहून गेलेला अधांतरी रॅम्प किती दिवस तग धरणार याची शाश्वती नाही. अनेकदा रॅम्प वर उसळणाऱ्या लाटां सोबत सेल्फी घेताना पर्यटक दिसतात.अशा वेळी रॅम्प कोसळ्यास जिवितहानी होऊ शकते.

गेल्या काही दिवसातील उधाणाची तिव्रता बघता १.७ किलोमीटर लांबीचा बंधारा त्या अनुषंगाने बंधाऱ्यावर झालेले सुशोभीकरण कितपत तग धरेल अशी शंका आता स्थानिक व्यक्त करत आहेत. काही दिवसांवर नारळी पौर्णिमा सण येत आहे. समुद्र किनाऱ्यावर नारळ फोडण्याच्या स्पर्धा तसेच प्रथेप्रमाणे सागराला श्रीफळ अर्पण करण्याची परंपरा आहे. या सणाच्या अगोदर नगरपरिषदेने रॅम्पची दुरूस्ती करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बापू ओवे यांना राष्ट्रपतींकडून पोलीसपदक

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

नवीमुंबई पोलीस दलातील न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत असलेले बापू ओवे यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २७ जुलै २०२५ रोजी पोलीस पदक जाहीर केले. त्यानुसार २९ जुलै २०२५ रोजी मलबार सभागृह, राजभवन मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते हे पदक प्रदान करण्यात आले.

त्यांनी अंमली पदार्थ विरोधी व अंबली पदार्थ विक्री करणारे गुन्हेगारांचा पर्दाफाश केला होता. आता उरणमध्ये न्हावा-शेवा पोलीस ठाणे येथे प्रभारी वरिष्ठ पोलीस म्हणून सचोटीने त्यांचे कर्तव्य बजावत आहेत.



त्यांना राष्ट्रपतींकडून पोलीसपदक मिळाल्यामुळे नवीमुंबई आयुक्तालयासह, उरण पोलीस ठाणे, मोरा सागरी पोलीस ठाणे, न्हावा-शेवा पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी, अंमलदार व यांच्यासह उरण तालुक्यातील सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## कित्ते भंडारी समाजातर्फे गुणगौरव

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड शहरातील भंडारवाडा श्रीकालभैरव देवस्थान ट्रस्ट कित्ते भंडारी समाजातर्फे दहावी, बारावी, पदवीधर विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी अवधूत भोसले, शार्दुल खोत, हृदया पुलेकर, रुद्र तोडणकर, आर्यन मयेकर, स्वरा सतवीडकर, ओम नाईक, स्वयम समीर तोडणकर, वेदांग विनोद अंबूकर, अर्थव मनीष खोत, दिव्यांग पालशेतकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी किरण सुर्वे, आशिष खोत, संगिता जमादार, स्वाती मयेकर, हेमंत केळसकर, दिपक आंबुकर, उत्तम पाटील, मंदार मुंबईकर, मोहन पाटील, मनोहर कासेकर, प्रभाकर तोडणकर, अशोक मोरे, महेश पाटील, उज्वला खेडेकर, दिपा पुलेकर, संगिता परकर उपस्थित होते.

**पुलाच्या लोखंडी पाईप गेले वाहून | चालकांना वाहन पुलाखाली जाण्याची भीती**

# दहिवली पुलावरील वाहतूक धोकादायक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ कळंब या राज्यमार्ग रस्त्यावरील दहिवली मालेगाव येथील पुलावरून पावसाळ्यात पाणी गेले आहे. त्या महापुरात पुलाच्या रेलिंगचे पाईप वाहून गेले असून पुलावरील खड्डे आणि पुलाचे रेलिंग तुडल्यामुले पूल धोकादायक बनला आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाची तत्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी वाहनचालक करीत आहेत.

माथेरान-नेरळ-कळंब या राज्यमार्ग रस्त्यावर उल्हास नदीवर दहिवली मालेगाव येथे पूल आहे. या पुलाचे बांधकाम ४० वर्षापूर्वी करण्यात आले होते. त्यावेळी हा पूल कमी उंचीचा बनविण्यात आल्याने पावसाळ्यात उल्हास नदीला पूर आल्यानंतर या पुलावरून पाणी जात असते. या पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात पूर आल्यानंतर पुलाच्या कठाड्यांना लावण्यात आलेले रेलिंग तुटतात आणि वाहून जातात. त्यामुळे पुलावरून पाणी गेल्यानंतर या पुलावरून होणारी वाहतूक बंद होते.



ही बाब लक्षात घेऊन या पुलाच्या बाजूला नवीन पूल बांधला जात असून त्या नवीन कामासाठी २५ कोटी निधी शासनाने मंजूर केला आहे. त्या ठिकाणी पुलाचे बांधकाम सुरू आहे मात्र, पुलाची निर्मिती पूर्ण होण्यास पुढचे वर्षे येणार आहे. मात्र, यावर्षी मे महिन्यात उल्हास नदीला आलेल्या महापुरात पुलाचे कठड्यांना लावलेले रेलिंग तुटून गेले आहेत. पुलावर पडलेले खड्डे वाहनचालकांची परीक्षा पाहणारे आहेत. त्यात पुलावर खड्ड्यांची रांगोळी दिसून येत असून खड्डे चुकविता असताना वाहन खड्ड्यातून थेट पुलाखाली जाण्याची भीती देखील वाहनचालक आणि स्थानिक ग्रामस्थ राजू मोरगे यांनी व्यक्त केली आहे. पुलावर पडलेले खड्डे हे नित्कृष्ट डांबरीकरण केल्याने पडले आहेत. एप्रिल महिन्यात पुलावर डांबरी पट्टे मारले होते आणि लगेच खड्डे पडतात याचा अर्थ काय? असा सवाल वाहनचालक विचारत आहेत. मात्र तुटलेल्या रेलिंग अधिक धोकादायक आहेत आणि त्या सार्वजनिक बांधकाम खात्याने तत्काळ दुरुस्त करावी अशी मागणी राजू मोरग यांनी केली आहे.

> या रस्त्याची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी असलेले सार्वजनिक बांधकाम खात्यांचे कर्जत कार्यालयाकडून पुलाची कठडे सुधारणा करण्याचे काम लवकरच पूर्ण करण्यात येईल.
> –संजीव वानखेडे
> उप अभियंता सार्वजनिक बांधकाम कर्जत

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी सांगितल्यावरुन आम्ही श्री. निखिल श्याम घिया रा. घिया मेंन्शन, १८, एम. एल. डहाणुकर मार्ग (कार्मायकल मार्ग), मुंबई ४०००२६ ('जमिन मालक') यांचे खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींचे हक्क, मालकी/स्वामित्व आणि हितसंबंध तपासत आहोत.

तरी सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत व त्यावरील एफ.एस.आय/टि.डी.आर लाभाबाबत कोणत्याही व्यक्तींचा अथवा इसम/इसमांचा कोणताही चा क्लेम कोणत्याही कोणत्याही प्रकारे/मार्गे विक्री, अदलाबदल, लिज, गहाण (इक्टिबल किंवा कोणत्याही प्रकारचे), बक्षिस, लिन, चार्ज, न्यास, वारसा हक्क, हिंदू एकत्र कुटुंब, पोटगीचा हक्क, मृत्युपत्र, ताबाकब्जा, इजमेंट, सबलिज, असाईनमेंट, कुळ, लायसन्स, प्लेज, गॅरंटी, कौटुंबिक व्यवस्थापन, विकसन हक्क, विकास व्यवस्थापन, सहयोग करार, सह उद्योग, कुलमुखत्यारपत्र, भागीदारी, कर्ज, आगावू देणे, लिज पेंडन्स, मनाई किंवा इतर अॅटॅचमेंट अथवा कोणत्याही कोर्टाचा अधिकाऱ्यांचा, न्यायाधिकरणाचा महसुली वा सविधी मान्य (स्टॅट्यूटरी) अधिकारी किंवा लवादाचा, हुकूमनामा, आदेश, अॅवार्ड अथवा न्याय निर्णय, जप्ती, चालू वहिवाट अगर लागू केलेल्या कायद्याप्रमाणे निर्माण झालेला हक्क, अग्रक्रयाधिकार, इतर कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या अधोरेखीत पत्त्यावर संबंधीत कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न नोंदविल्यास सदर नोटीसीत नमुद मिळकती संबंधी दावा/दावे, क्लेम, हरकती, जे कोणते असतील, ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल आणि आमचे आशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील.

**परिशिष्ट**

**('सदर मिळकत')**

मौजे थळ, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, तालुका व नोंदणी उपजिल्हा अलिबाग, जिल्हा व नोंदणी जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथील शेतजमिन मिळकती (१) सर्व्हे नं. २०८ हिस्सा नं. २ क्षेत्रफळ ०० हे. ४२ आर. ५० पॉ, (२) सर्व्हे नं. २०९ हिस्सा नं. १ क्षेत्रफळ ०१ हे. ९५ आर. ०० पॉ., (३) सर्व्हे नं. २२५ हिस्सा नं. ३/अ क्षेत्रफळ ०० हे. ०४ आर. ६० पॉ., आणि (३) बिनशेती मिळकत सर्व्हे नं. २०९ हिस्सा नं. २ क्षेत्रफळ २०० चौरस मिटर त्यावर स्थित असलेल्या बांधकाम रचना मालमत्ता क्रमांक ४७१ ते ४८१ त्यास चतुः सिमा खालीलप्रमाणे आहेत.

पूर्वेस : गल्ली आणि सर्व्हे नं २२५ हिस्सा नं २, ३ ब आणि ४
पश्चिमेस : सरकारी जमीन सर्व्हे नं १६ आणि अरबी समुद्र
उत्तरेस : सर्व्हे नं २२६ आणि सर्व्हे नं २०८ पैकी उवरित क्षेत्र
दक्षिणेस : जमिन आणि सर्व्हे नं २०७ आणि सरकारी जमीन सर्व्हे नं १६ पैकी क्षेत्र

तारीख : ३१/०७/२०२५

सही/-
**मे. लॉ पॉईंट**
अॅडव्होकेटस अॅन्ड सॉलिसिटर्स
३०१, वैभव चेंबर्स, तिसरा मजला,
जगत विद्या मार्ग,
गुरुनानक हॉस्पिटल जवळ,
बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स,
बांद्रा (पु), मुंबई.-४०००५१
Email : responce@lawpointindia.com

**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**

कार्यालय :-
जुने सचिवालय,२ रा मजला, फोर्ट, मुंबई ३२
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८४४६३४
Email : registrarmrt@yahoo.in

क्र.अध्यक्ष/टेनन्सी/रिव्ही/रायगड/एल-४९२/२०२३
दिनांक :- ०३/०७/२०२५

प्रति,
श्रीम. आशा अशोक गीध
रा. गीध हाऊस, उरण मोरा रोड
नयन अपार्टमेंट समोर ता. उरण जि. रायगड

**विरूद्ध**

१. श्रीम.येसुबाई हरिश्चंद्र म्हात्रे
२. श्री.जितेंद्र हरिश्चंद्र म्हात्रे
३. अजित हरिश्चंद्र म्हात्रे
४. श्रीम.नंदा सुधीर म्हात्रे
५. श्रीम.सविता प्रकाश म्हात्रे
६. श्रीम.साधना अविनाश माळी
७. श्री.करण सुधीर म्हात्रे
सर्व रा.चाणजे ता.उरण जि.रायगड
८. भुमि संपादन अधिकारी, मेट्रो सेंटर १ उरण
९. सिडको लि.सी.बी.डी. नवी मुंबई
१०. श्री.विनायक अशोक गीध
११. श्री.उमेश अशोक गीध
१२. श्रीम.योगिता अशोक गीध
सर्व रा.लब बिल्डींग, निकेत्वरी लेन
जैन हॉस्पीटल समोर गिरगाव, मुंबई ४०० ००४

**विषय :- सुनावणी नोटीसीबाबत**

वरील नांव धारण करणारा. अर्जदार यांनी उप विभागिय अधिकारी, पनवेल यांचेकडील क्र. टेनन्सी/अपील क्र. ३४/२०२३ दि.२७/०१/२०२३ च्या आदेशाबाबत केलेल्या उपनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी दिनांक २५/०९/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता न्यायाधिकरणापुढे खालील पत्त्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

सही/-
**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई**

**सुनावणीचे ठिकाण**
महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे, वरसोली ता.अलिबाग येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत १ श्री.निलेश दत्तात्रेय पाटील, २. श्री.शैलेश दत्तात्रेय पाटील, ३.सौ.प्रतिक्षा प्रदिप नांदेकर, ४. सौ.उज्वला उमेश थळे रा.नांदे-वरसोली, पो.वरसोली, ता.अलिबाग जि.रायगड यांच्या मालकीची असून, सदरील जमीन मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, तशा आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेली आहे. सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या वहिवाटिचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|---|
| वरसोली, ता.अलिबाग जि.रायगड | २७६/३०/१/ड | ०-४९-३०<br>पो.ख. ०-०५-३०<br>एकूण ०-५४-६० | १२.०१ |

वर नमूद जमिन मिळकतीपैकी श्री. निलेश दत्तात्रेय पाटील वगैरे ३ यांच्या मालकीचे ०-२२-३० हे. आर पो.ख. ०-०५-३० हे.आर एकूण क्षेत्र ०-२७-६० हे. आर आकार ५.४३ रु.पै. या जमिन मिळकतीपैकी ०-२०-०० हे.आर क्षेत्र जाहीर नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग
दिनांक : ३१/०७/२०२५

सही /-
**(अॅड.वैभव वसंत पाटील)**
रा.नवेदर बेली, ता.अलिबाग
जि. रायगड, मो.९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

**उपविभागीय अधिकारी सुधागड, जि.रायगड यांच्या न्यायालयात**

**जाहीर नोटीस**

**सुनावणीची नोटीस** **आर.टी.एस.अपिल नं.७८/२०२५**

(१) श्री.हरबीर सिंग अधना सन ऑफ फुलसिंग अधना
अखत्यारी श्री.शिवाजी बबनराव मांढरे ... अपिलार्थी
रा.चाकण रोड, मांढरे वस्ती, शिक्रापूर, जि.पुणे

**विरुद्ध**

१) तलाठी सजा हेदवली
२) मंडळ अधिकारी जांभुळपाडा
३) श्री.बापू बबन माझीरे ... उत्तरार्थी
रा.१३२ इंद्रायणी सोसायटी, स्वामी विवेकानंद रोड
कोथरुड पुणे ४११०३८

सर्व संबंधितांना या नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी या न्यायालयात मौजे कळंब, ता.सुधागड येथील गट नं.८०/१ या मिळकतीमधील फेरफार क्र.१७७७ च्या विरोधात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये या कार्यालयात अपिल दाखल केले आहे.

सबब या नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की, या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी संबंधितांनी दिनांक ०७/०८/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, सुधागड येथे आमचे कार्यालयात सकाळी १२-०० वाजता आपण स्वतः वा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमूद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे दि.३१/०७/२०२५

सही/-
**(सायली ठाकूर)**
**उपविभागीय अधिकारी सुधागड**
**उपविभाग रोहा**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री.बबन बामा पाटील यांनी त्या मिळकतींचे मालक श्री. लक्ष्मण पिराजी शिंगटे यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे कळंभे, ता.मुरबाड, जि. ठाणे**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर पॉ/चौ.मि. | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| श्री.लक्ष्मण पिराजी शिंगटे | २२ | ७/अ | १.००.०० | ०.८५ |
| | २५ | २ | ०.९२.०० | ०.६० |
| | २२ | ७/ब | ०.९६.१० | ०.७० |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतींबाबत इतर दुसरे कोणाचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख- ०१/०८/२०२५

**अॅड. दिपाली राहूल शिंदे,**
बी. एल.एस, एल.एल.बी,
अॅडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१९४९४
९०११७१६००१

**जाहीर नोटीस**

**श्रीवर्धन येथील मा. उपविभागीय अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

आर. टी. एस. अपिल ६४/२०२५

१) सौ. सुलोचना गोविंद पाटील
वय : ८० वर्षे व्यवसाय : गृहिणी
२) श्री नंदकुमार गोविंद पाटील ... अपिलार्थी
वय ६४ वर्षे व्यवसाय शेती
दोघेही रा. बोर्लीपंचतन ता.
श्रीवर्धन जि.रायगड

विरुद्ध

१) श्री. महादेव सहादेव तुरे (मयत)
१/१ श्रीम. रुक्मिणी महादेव तुरे
वय वर्षे व्यवसाय :गृहिणी
१/२ श्री शशिकांत महादेव तुरे
वय वर्षे व्यवसाय शेती
रा. मु.पो गोंडघर ता. म्हसळा जि रायगड
१/३ श्रीमती शारदा महादेव पोटले ... उत्तरार्थी
वय वर्षे व्यवसाय : गृहिणी
रा. मु पो. भरडखोल
ता. श्रीवर्धन जि. रायगड
२) श्री. शांताराम सहादेव तुरे (मयत)
२/१ श्रीम. विठाबाई शांताराम तुरे
वय वर्षे व्यवसाय गृहिणी
२/२ श्री विष्णू शांताराम तुरे
वय वर्षे व्यवसाय शेती
२/३ श्री. श्रीपत शांताराम तुरे
वय वर्षे व्यवसाय शेती
२/४ श्री. निलेश शांताराम तुरे
वय वर्षे व्यवसाय शेती
२/५ श्री संतोष शांताराम तुरे
वय वर्षे व्यवसाय शेती
२/६ श्रीमती विजयश्री विजय भोगल
वय वर्षे व्यवसाय गृहिणी
उत्तरार्थी क्र १/३ ते २/६ सर्व
रा. गोंडघर ता. म्हसळा जि रायगड
३) श्रीमती बनीबाई हरी आग्री
वय वर्षे व्यवसाय : गृहिणी
रा. मु. कुडकी. पो. वडवली
ता श्रीवर्धन जि. रायगड
४) श्री.जगन्नाथ गणपत तुरे
वय वर्ष व्यवसाय शेती
५) श्री. लहू गणपत तुरे
वय वर्षे व्यवसाय शेती
६) श्रीम. बेबीबाई नारायण बेचावडे वय वर्षे व्यवसाय गृहिणी
७) श्री. गोविंद हरिश्चंद्र तुरे (मयत)
७/१ श्रीम. शेवंती गोविंद तुरे
वय सज्ञान वर्ष व्यवसाय गृहिणी
७/२ श्री. आदेश गोविंद तुरे
वय सज्ञान वर्ष व्यवसाय शेती
७/३ श्री. संदेश गोविंद तुरे
वय सज्ञान व्यवसाय शेती
८) श्री अशोक हरिश्चंद्र तुरे
वय वर्षे व्यवसाय शेती
९) श्रीम. चित्रा हरिश्चंद्र तुरे
वय वर्षे व्यवसाय गृहिणी
१०) श्रीमती योगिता हरिश्चंद्र तुरे
वय वर्षे व्यवसाय गृहिणी
११) श्री. योगेश हरिश्चंद्र तुरे (मयत)
११/१ श्रीम. यशमिता योगेश तुरे
वय वर्षे व्यावसायिक शेती
अ क्र. ४ ते ११ सर्व रा. गोंडघर
ता. श्रीवर्धन जि. रायगड

प्रस्तुत प्रकरणातील सर्व उत्तरार्थी यांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अपिलार्थी यांनी मा. उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांचे न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये मंडळ अधिकारी मेंदडी यांनी दिनांक १८/०४/२०२५ रोजी नामंजूर केलेली फेरफार नोंद १५२२ च्या निर्णया विरोधात अपिल दाखल केले आहे. सदर प्रकरणी सर्व उत्तरार्थी यांना त्यांच्या मूळ राहत्या घराच्या पत्त्यावर प्रस्तुत अपील कामे नोटीस बजावण्यात आली होती. मात्र उत्तरार्थी क्र. ११/१ श्रीम. यशमिता योगेश तुरे यांनी नोटीस स्वीकारलेली नाही. सदर प्रकरणाची पुढील नियोजित तारीख दि.०७/०८/२०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजता ठेवण्यात आलेली आहे. तरी तुम्ही अथवा तुमचे प्रतिनिधी यांनी तुमची कोणतीही हरकत असल्यास तुमचे म्हणणे मांडण्यासाठी सदरच्या दिवशी नियोजित वेळेत हजर राहावे. नियोजित वेळी तुम्ही उपस्थित न राहिल्यास तुमच्या अथवा तुमच्या प्रतिनिधीच्या गैरहजेरी अपिलाची सुनावणी होऊन निकाल केला जाईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दि. २२/०७/२०२५

सही/-
**(महेश पाटील)**
उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे कोर्लई, ता. मुरूड, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची जमिन मिळकत श्री. तेजस सुनिल पाटील रा. मु. पो. रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून सदरील जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कोर्लई, ता. मुरूड | ३५/२/अ | वरकस ०-३६-५०<br>पो.ख. ०-०५-५०<br>एकूण क्षेत्र ०-४२-०० | ०.८२ |

वर नमूद मिळकतीपैकी श्री. तेजस सुनिल पाटील यांच्या मालकीचे एकूण क्षेत्र ०-०९-०० हे.आर. ही जमिन मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ३१/०७/२०२५

सही/-
**अॅड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी,
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीनमिळकती संदर्भित जमीनमिळकतींचे विद्यमान मालक १) सौ. दीपा भाविन जरीवाला व २) श्री. अवनी रमेशचंद्र झवेरी यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्या आशयाचा साठेकरार माझे अशील व विद्यमान मालक यांचेदरम्यान स्वाक्षरीत झालेला आहे. संदर्भित जमीनमिळकती ह्या पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतींमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतींचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतींचे परिशिष्ट :-**

| अ क्र. | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड. | ८०२ | ०-१०-०० | ०.१६ |
| २. | धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड. | ८०३ | ०-११-०० | ०.१९ |

अलिबाग,
दिनांक ०१/०८/२०२५

**राजेंद्र दा. पाटील,**
अॅडव्होकेट
कृष्णवंदन - २, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९८२२५२८९३१

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक श्री.राजेंद्र महादेव बोडके रा.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे सावेळे, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| स.नं/हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ८/१/ब | एकुण क्षेत्र ०-२७-३० | १-८७ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- ३१/०७/२०२५

सही /-
**अॅड.गीतांजली जी.फुलावरे**
कार्यालय पत्ता : ''मधुतारा'' बिल्डींग, कचेरी रोड,
कर्जत ता.कर्जत, जि.रायगड.
मो.८८८८०४५३७६/८६००३५२९८२

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला,
एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला,
काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२

क्रं. अपिल/डेस्क/आरटीएस/रिव्ही/२४४/२०२५ दिनांक :- १५/०७/२०२५

जाहिर नोटीस
प्रति
१. फातीमा अबुबकर मणेर (मयत तर्फे वारस)
१.१ इरफान अबुबकर मणेर
रा. धावीर रोड सुंदर नगर
पो.ता. रोहा जि. रायगड
क्र. १/१ तर्फे अखत्यारी ... अर्जदार
सौ. दिलारा इरफान मणेर
विरूद्ध
१. फिरोज युसूफ खान
रा. रुम नं.१ होलादेवी चौक,
कल्याण (प) जि. ठाणे
२. मंडळ अधिकारी हमरापूर
३. तहसिलदार पेण
४. आत्माराम पद्मा किणी
५. हरिश्चंद्र सुकऱ्या पाटील
६. शंकर खंडेराव फणसे
क्र. ४ ते ६ रा. मु. खारसापोली
ता. पेण जि. रायगड ...सामनेवाले

**विषय : अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद / अपिल क्र. २११/२०२१ दि. २१/११/२०२४ चे विरुद्ध फेरतपासणी अर्ज**

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील फेरतपासणी अर्जाची सुनावणी (विलंबाच्या मुद्यावर ) मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १३.०८.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
नायब तहसिलदार (अपिले)
अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग करीता

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र / करारनामा)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | |
| १ | खारघर ४३९ | खारघर ६०५ | ४४४/२अ<br>४४४/२ब<br>४४५/२अ<br>४४५/२ब<br>४४५/२क<br>४४५/२ड | ०-१८-२<br>०-१३-१<br>०-१६-०<br>०-४४-७<br>०-२८-४<br>०-४४-२ | १४५० चौ.मी. पात्रता मंजूर असून पैकी ११५० चौ.मी. वाटपित होऊन उर्वरीत ३०० चौ.मी. इरादित पात्रता | भूखंड क्र.६८A, सेक्टर-३५E, क्षेत्र - ३०० चौ.मी. | १. श्री.मनोहर हासुराम म्हात्रे<br>२. कुमारी.पायल भालचंद्र म्हात्रे (अज्ञान पालनकर्ता काका श्री.मनोहर हासुराम म्हात्रे<br>३. एकनाथ हासुराम म्हात्रे<br>४. नामदेव हासुराम म्हात्रे | - |
| | | | एकूण क्षेत्र | १-६४-६ | | | | |
| २ | खारघर १२१ | खारघर ३६९ | १५५/१९<br>१/३<br>५/२+३<br>५/५+६<br>५/८+९<br>३३४/५<br>१०/३<br>११/५<br>१४/४<br>११/३<br>१७/५<br>१२९/० | ०-०४-०<br>०-१०-७<br>०-१२-०<br>०-४६-६<br>०-११-४<br>०-२०-०<br>०-३३-०<br>०-१४-०<br>०-४१-२<br>०-०४-३<br>०-१७-०<br>०-५९-७ | २९०० चौ.मी. पैकी ५०० चौ.मी | भुखंड क्र.१५०A, सेक्टर-१३, क्षेत्र ४९३.४२ चौ.मी. | १. हिरा जानू तोडकर<br>२. श्री.शत्रूघ्न जानू तोडकर | मा. दिवाणी न्यायाधीश क्र. स्तर दावा क्र. स्पे.मु.क्र.८१८/२०१२ मधील तडजोड पुरशीसनुसार |
| ३ | | ९०C | १९७/२ब | ०-२३-७ | | | | |
| ४ | | ३९, | २/४+६ +९/१ | ०-२१-५ | | | | |
| ५ | | १८७ | १२३/२५ | ०-०९-७ | | | | |
| | | **एकूण संपादित क्षेत्र** | | **३-२९-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२०१/२०२५-२६

## निवडक

### आयसीसी क्रमवारीत उलथापालथ

**नवी दिल्ली :** भारत विरुद्ध इंग्लंड मालिकेतील अखेरच्या सामन्यापूर्वी आयसीसीने नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. आयसीसीकडून नुकतीच नवीन कसोटी क्रमवारी जाहीर करण्यात आली आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट ९०४ रेटिंगसह अव्वल स्थानी विराजमान आहे. त्यानंतर न्यूझीलंडचा केन विल्यमसन दुसऱ्या क्रमांकावर आहे. सध्या त्याचे रेटिंग ८६७ आहे. इंग्लंडचाच हॅरी ब्रूक ८३४ रेटिंगसह तिसऱ्या स्थानी कायम आहे, तर स्टीव्ह स्मिथ ८१६ रेटिंग गुणांसह चौथ्या क्रमांकावर आहे. दक्षिण आफ्रिकेच्या टेंबा त्याला एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो आता ७९० रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर पोहोचला आहे. श्रीलंकेच्या कामिंदू मेंडिसलाही एका स्थानाचा फायदा झाला असून, तो ७८१ रेटिंगसह सहाव्या क्रमांकावर गेला आहे. भारताच्या ऋषभ पंतने एका स्थानाची झेप घेतली आहे. तो आता ७७६ रेटिंग गुणांसह सातव्या क्रमांकावर पोहोचण्यात यशस्वी ठरला आहे. दरम्यान, भारताच्या यशस्वी जैस्वालला मोठे नुकसान झाले आहे. त्याची तीन स्थानांनी घसरण झाली असून, तो थेट आठव्या क्रमांकावर आला आहे. त्याचे रेटिंग आता ७६९ आहे. भारतीय संघाचा कर्णधार गिल नवव्या क्रमांकावर कायम आहे. चौथ्या कसोटीत अप्रतिम खेळी करणाऱ्या इंग्लंडच्या बेन डकेटला पाच स्थानांचा फायदा झाला आहे. तो ७४३ रेटिंगसह दहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे.



### राज्यस्तरीय कबड्डी पंच शिबिराचे आयोजन

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिशनच्या मान्यतेने, रत्नागिरी जिल्हा कबड्डी असो. व रत्नागिरी तालुका हौशी कबड्डी असो. यांच्या विद्यमाने राज्य स्तरीय श्रेणी कबड्डी पंच शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रत्नागिरी, नाचणे रोड येथील दैवज्ञ भवन येथे दि. १ ते ३ ऑगष्ट २०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहे. या शिबिरात पुरुषोत्तम प्रभू, डॉ. वीणा शेलटकर(खवळे), आकाश राठोड मार्गदर्शन करणार आहेत. त्याचबरोबर मिनानाथ धानजी, सदानंद माजलकर, डॉ. माधव शेजूळ, प्रा. नवनाथ लोखंडे, दत्ता झिजुर्डे, मालोजी भोसले, शशिकांत राऊत हे नियमांची उजळणी, शिट्टीचे प्रकार व सिंग्नलिग, बाद व साख-ळी पद्धतच्या सामन्यांची भाग्यपत्रिका कशी तयार करावी?, निर्णयावर समज-गैरसमज, पंचांच्या निर्णया बाबत शंका कुशंका, सामनाधिकाऱ्यांचे कार्य व कर्तव्य, शंका निरसन यावर मार्गदर्शन करतील. पंचांचे समूह बनवून विषयानुरूप चर्चा, सामन्यांच्या चित्रफीत दाखवून त्यावर चर्चा. या शिबिराचे उदघाटन शनिवार (दि.२) ऑगष्ट रोजी सकाळी ९-३० वा. रत्नागिरी जिल्हा कबड्डी असो. चे अध्यक्ष उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. राज्य कबड्डीसंघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे, मंगल पांडे, जिल्हा कबड्डी संघटनेचे कार्याध्यक्ष मंगेश तांबे आदी मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित रहाणार आहेत.

### भारताचा सामना ताजिकिस्तानशी

**नवी दिल्ली :** नेशन्स फुटबॉल करंडक येत्या २९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये भारतीय पुरुष फुटबॉल संघाचा समावेश आहे. भारतीय संघाचा ब गटात समावेश असून, या गटामध्ये ताजिकिस्तान, इराण व अफगाणिस्तान या देशांशी त्यांना दोन हात करावे लागणार आहेत. भारताचा सलामीचा सामना ताजिकिस्तानशी होणार आहे. ही लढत २९ ऑगस्टला रंगणार आहे.केंद्रीय आशियाई विभागीय स्पर्धा म्हणून नेशन्स करंडकाकडे बघितले जाते. एएफसी आशियाई करंडक (२०२७) पात्रता फेरीआधी भारतीय फुटबॉल संघाला या स्पर्धेद्वारे कसून सराव करता येणार आहे. भारताचा सलामीचा सामना ताजिकिस्तानशी झाल्यानंतर त्यांना १ सप्टेंबर रोजी इराणशी लढावे लागणार आहे. भारताचा अखेरचा सामना ४ सप्टेंबर रोजी अफगाणिस्तानशी होईल. 'अ' गटामध्ये उझबेकिस्तान, किर्गिस्तान, तुर्कमेनिस्तान, ओमान या देशांचा समावेश करण्यात आला आहे.



# ओव्हलवर 'करो या मरो'!

## इंग्लंड मालिकेत २-१ ने आघाडीवर

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

मैदानावर इंच न इंच भूमी लढवण्यासाठी रंगलेला पराकोटीचा संघर्ष, क्षणोक्षणी शाब्दिक चकमकी आणि थकल्या-भागल्या शरीरांनी दिलेली कडवी झुंज दिली. अशा अनेक नाट्यमय घडामोडींनी गाजलेल्या भारत-इंग्लंड कसोटी मालिकेचा पाचवा आणि निर्णायक रणसंग्राम आजपासून ओव्हलच्या मैदानावर रंगणार आहे. इंग्लंड या मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे. त्यामुळे इंग्लंडला हा सामना बरोबरीत राखल्यानंतरही मालिका विजयाची संधी आहे. तर दुसऱ्या बाजूला भारतासाठी हा सामना करो या मरो असा आहे. इंग्लंडला मालिका जिंकण्यापासून रोखायचे असेल तर भारताला कोणत्याही स्थितीत हा सामना जिंकणं महत्त्वाचे आहे.

इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. या सामन्यात भारतीय संघ तीन बदलांसह आला आहे. ऋषभ पंत दुखापतग्रस्त झाल्यानंतर ध्रुव जुरेलला संधी मिळाली आहे. शार्दुल ठाकूरच्या जागी करुण नायरचा, जसप्रीत बुमराहच्या जागी प्रसिद्ध कृष्णाचा समावेश करण्यात आला आहे. अंशुल कंबोजला बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. त्याच्या जागी आकाश दीपचा समावेश करण्यात आला आहे.



इंग्लंडची प्लेइंग इलेव्हन: जॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप (कर्णधार), जो रूट, हॅरी ब्रूक, जेकब बेथेल, जेमी स्मिथ (यष्टीरक्षक), ख्रिस वोक्स, गस ॲटकिन्सन, जेमी ओव्हरटन, जोश टंग

भारतीय संघ प्लेइंग इलेव्हन: यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, शुभमन गिल (कर्णधार), वॉशिंग्टन सुंदर, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), करुण नायर, आकाश दीप, प्रसिद्ध कृष्णा, मोहम्मद सिराज.



### गिलचा कस लागणार

**शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील युवा भारतीय संघाने मालिकेत दाखवलेली आक्रमकता आणि इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सचा प्रतिहल्ला, यामुळे या अंतिम सामन्यातही थरार शिगेला पोहोचणार हे निश्चित आहे. त्यामुळे, मालिकेचा निकाल काहीही लागो; पण क्रिकेटच्या या महानाट्याचा शेवटचा अंकही तितकाच अविस्मरणीय ठरेल, यात शंका नाही.**

# अभिषेक शर्मा टी-२०चा नवा 'किंग'



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा युवा फलंदाज अभिषेक शर्मा याने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) बुधवारी जाहीर केलेल्या ताज्या टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत तो अव्वल स्थानी विराजमान झाला आहे. यासह त्याने ऑस्ट्रेलियाच्या ट्रॅव्हिस हेडला मागे टाकले आहे. २४ वर्षीय अभिषेकच्या शिरपेचात हा मानाचा तुरा अनायासे खोवला गेला आहे.

सध्या त्याच्या खात्यात ८२९ रेटिंग रमा आहे, तर ऑस्ट्रेलियाचा धडाकेबाज फलंदाज हेड ८१४ रेटिंगसह दुसऱ्या स्थानी घसरला आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या नुकत्याच पार पडलेल्या टी-२० मालिकेतून माघार घेण्याच्या निर्णयाचा हेडला मोठा फटका बसला. त्याने ऑस्ट्रेलियाकडून अखेरचा टी-२० सामना सप्टेंबर २०२४ मध्ये खेळला होता.

या कामगिरीसह अभिषेकने एका विशेष क्लबमध्ये स्थान मिळवले आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावणारा तो विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव यांच्यानंतरचा तिसरा भारतीय खेळाडू ठरला आहे.

# 'वर्ल्ड चॅम्पियन' दिव्याचे जल्लोषात स्वागत



**। नागपूर । प्रतिनिधी ।**

जॉर्जिया येथे नुकत्याच पार पडलेल्या महिलांच्या विश्वकरंडक बुद्धिबळ स्पर्धेत इतिहास घडवून मायदेशी परतलेल्या मवर्ल्ड चॅम्पियनफ दिव्या देशमुखचे उपराजधानीत ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी दिव्याने विजयाबद्दल आनंद व्यक्त करून विजयाचे श्रेय दिले आईवडील, प्रशिक्षक व नागपूरकर चाहत्यांना दिले. यावेळी राज्य बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष परिणय फुके, चेस असोसिएशन नागपूरचे अध्यक्ष गिरीश व्यास यांनी पुष्पहार घालून तिचे जोरदार स्वागत केले. यावेळी चेस असोसिएशन नागपूरचे कार्यकारी अध्यक्ष सच्चिदानंद सोमण, आंतरराष्ट्रीय खेळाडू अभिजित कुंटे यांच्यासह बुद्धिबळ संघटनेचे अनेक पदाधिकारी, आजी-माजी खेळाडू, क्रीडाप्रेमी, शालेय विद्यार्थी व दिव्याच्या परिवारातील अन्य सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहिलची तिरंदाजीत सुवर्णपदकाला गवसणी

**। नागठाणे । प्रतिनिधी ।**

साहिल जाधव याने जर्मनीमध्ये झालेल्या जागतिक विद्यापीठ स्पर्धेत तिरंदाजी खेळात देशाला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. प्रतिकूल परिस्थितीतील त्याच्या या यशाचे कौतुक होत आहे.

साहिलेने जर्मनीतील राईन-रुहर येथे सुरू असलेल्या जागतिक स्पर्धेत पुरुषांच्या वैयक्तिक आर्चरी विभागात ब्रिटनच्या स्कॉटला पराभूत करत सुवर्णपदकाला गवसणी घातली. दहावीनंतर साहिल तिरंदाजी खेळाकडे वळला. त्यावेळी वाई येथे आयोजित शिबिरात त्याने आपल्या नैपुण्याची चमक दाखविली. तिथे प्रशिक्षक चंद्रकांत भिसे यांनी त्याच्यातील गुणवत्ता हेरली. पुढे दृष्टी कॅडमीचे प्रवीण सावंत यांनी गुणवत्तेला पैलू पाडले. गेल्या सात वर्षांच्या काळात साहिलने जिल्हा, राज्य पातळीवर भरीव यश पटकाविले आहे. सध्या तो कोलकत्यात साई संस्थेत सराव करत आहे. साहिल हा प्रचंड मेहनती खेळाडू आहे. कित्येकदा त्याला यशाने हुलकावणी दिली. मात्र, तो कधीच नाउमेद झाला नाही. हीच गोष्ट आज त्याला जागतिक स्पर्धेतील सुवर्णपदकाकडे घेऊन गेली असे प्रवीण सावंत, प्रशिक्षकांनी सांगितले.



### हेड कोचला बाहेरचा रस्ता

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२६ स्पर्धेसाठी आतापासून तयारी सुरु झाली आहे. कोलकाता नाईट रायडर्सने हेड कोच चंद्रकांत पंडित यांच्यापासून वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली नाईट रायडर्सने तिसऱ्यांदा आयपीएल किताब जिंकला होता. पण आता केकेआरला त्यांची साथ मिळणार नाही. पंडित यांचा केकेआरसोबत २०२२ पासून प्रवास सुरु झाला होता. ब्रँडन मॅक्युलमन यांच्या जागी त्यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती आली आहे.

# पूजा तांबे आशियाई स्पर्धेत चमकली

**। नाशिक । वृत्तसंस्था ।**

दक्षिण कोरियातील जिचॉन येथे पार पडलेल्या विसाव्या आशियाई रोलर स्केटिंग स्पर्धेत भारताच्या रोलर डर्बी संघाने उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर उपविजेतेपद पटकावले. या भारतीय संघात नाशिकच्या पूजा तांबे हिचा सहभाग होता. अंतिम फेरीत भारताचा सामना बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघाशी झाला. थरारक वातावरणात झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम क्रमांक मिळवला. तर भारतीय संघाला द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले. स्पर्धेत जपानचा संघ तृतीय क्रमांकावर राहिला. भारतीय संघात महाराष्ट्रातून नाशिकची पूजा तांबे, कॅरोलिन फर्नांडिस, तेजस्विनी कदम आणि श्रुतिका सरोदे या चारही खेळाडूंनी सहभाग घेतला.

पूजा तांबेने २०२४ साली इटलीमध्ये झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवून देशाचे नाव उज्ज्वल केले होते. आता पुन्हा आशियाई पातळीवर एकदा आपली छाप पाडली आहे.



# आशियाई बॉक्सिंगसाठी भारतीय सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

थायलंडमधील बँकॉक येथे ३० जुलै ते १२ ऑगस्ट यादरम्यान आशियाई बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा रंगणार आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेमध्ये १९ वर्षांखालील व २२ वर्षांखालील अशा दोन गटांमध्ये २६ देशांतील ३९६ खेळाडूंचा कस लागणार आहे. भारताचा ४० खेळाडूंचा संघदेखील सज्ज झाला आहे. वर्ल्ड बॉक्सिंग संघटनेच्या पुढाकाराने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. आशियाई बॉक्सिंग संघटना व थायलंड बॉक्सिंग संघटना यांच्या वतीने ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. २००७ ते २००८ यादरम्यान जन्मलेले खेळाडू १९ वर्षांखालील वयोगटात सहभागी होणार आहेत. तसेच २००४ ते २००६ यादरम्यान जन्मलेले खेळाडू २२ वर्षांखालील वयोगटात सहभागी होणार आहेत.

### खेळाडूंचा लागणार कस



पुरुष व महिला अशा दोन्ही विभागांत खेळाडूंचा कस लागणार आहे. १० वजनी गटांमध्ये जेतेपदासाठी प्रयत्नजगभरातील खेळाडू १९ वर्षांखालील व २२ वर्षांखालील आशियाई स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत. पुरुष व महिला अशा दोन विभागांत खेळाडूंची विभागणी होईल. प्रत्येक प्रकारात १० वजनी गटांचा समावेश आहे. १९ वर्षांखालील पुरुषांच्या विभागात ४७ किलो वजनी गट ते ९० पेक्षा जास्त किलो वजनी गट यादरम्यानच्या १० वजनी गटात खेळाडूंना जेतेपदासाठी प्रयत्नांची शिकस्त करावी लागणार आहे. १९ वर्षांखालील महिलांच्या विभागात ४५ किलो वजनी गट ते ८० पेक्षा जास्त किलो वजनी गट यादरम्यानच्या १० वजनी गटात खेळाडूंना विजयासाठी झुंज द्यावी लागणार आहे. २२ वर्षांखालील पुरुष व महिला अशा दोन्ही विभागांत १९ वर्षांखालील विभागाप्रमाणेच वजनाची गटवारी असणार आहे. विश्वनाथ, प्रीत, सुमन, याक्षिकावर मदारभारताचा ४० खेळाडूंचा संघ आशियाई स्पर्धेसाठी सज्ज झाला आहे.

# पाचव्या कसोटीतून स्टोक्सची माघार

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडच्या संघाला पाचव्या कसोटीच्या आदल्या दिवशी मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स याने दी ओव्हल कसोटीतून माघार घेतली आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने बुधवारी पाचव्या कसोटीसाठी प्लेइंग इलेव्हन जाहीर केली आणि त्यात चार बदल करण्यात आले आहे. भारत या मालिकेत १-२ असा पिछाडीवर आहे आणि बेन स्टोक्सच्या अनुपस्थितीत भारताला पाचवी कसोटी जिंकून मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवण्याची आयती संधीच मिळाली आहे. भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेत कर्णधार बेन स्टोक्सने दमदार कामगिरी केली आहे. त्याने फलंदाजीत चांगली कामगिरी केली आहे, तर गोलंदाजीत त्याने १७ विकेट्स घेतल्या आहेत. स्टोक्ससह, जोफ्रा आर्चर, लिएम डॉसन व ब्रेसन कार्स यांनाही या कसोटीत खेळता येणार नाही.



## मराठमोळ्या आयुष म्हात्रेकडे कर्णधारपदीची धुरा | पाच खेळाडूंना राखीव संधी

# ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय संघ सज्ज

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।**

**भारतीय संघ शुबमन गिल याच्या नेतृत्वात इंग्लंड दौऱ्यावर आहे. भारतीय संघ इंग्लंड विरूद्धच्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-२ ने पिछाडीवर आहे. पाचव्या सामन्याआधी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी अंडर १९ भारतीय संघाची घोषणा केली आहे.**



अंडर १९ भारतीय संघ युवा आयुष म्हात्रे याच्या नेतृत्वात २७ जून ते २३ जुलैदरम्यान इंग्लंड दौरा केला. अंडर १९ भारतीय संघाने इंग्लंड विरुद्धची ५ मॅचची यूथ वनडे सीरिज ३-२ ने जिंकली. त्यानंतर उभय संघातील चार दिवसांचे दोन्ही सामने अनिर्णित राहिले. त्यानंतर आता अंडर १९ भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यासाठी बीसीसीआयने १७ सदस्यीय मुख्य संघ जाहीर केला आहे. त्यानुसार मराठमोळ्या आयुष म्हात्रे याच्याकडे या संघाच्या कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. तर विहान मल्होत्रा हा उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आलीय. अभिज्ञान कुंडु आणि हरविंश सिंह या दोघांना विकेटकीपर म्हणून संधी देण्यात आली आहे. निवड समितीने मुख्य संघाव्यतिरिक्त ५ खेळाडूंना राखीव म्हणून संधी दिली आहे.

### एकदिवसीय मालिकेचं वेळापत्रक

**पहिला सामना, रविवार २१ सप्टेंबर, नॉर्थ्स**
**दुसरा सामना, बुधवार २४ सप्टेंबर, नॉर्थ्स**
**तिसरा सामना, शुक्रवार २६ सप्टेंबर, नॉर्थ्स**

**मल्टी डे मॅच**
**पहिला सामना, ३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर, नॉर्थ्स**
**दुसरा आणि अंतिम सामना, ७ ते १० ऑक्टोबर, मॅकाय**

**अंडर १९ भारतीय संघ**
**आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, वेदांत त्रिवेदी, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (विकेटकीपर), हरवंश सिंग (विकेटकीपर), आर. एस. अंबरीश, कनिष्क चौहान, नमन पुष्पक, हेनिल पटेल, डी दीपेश, किशन कुमार, अनमोलजीत सिंग, खिलन पटेल, उद्धव मोहन आणि अमन चौहान.**
**राखीव खेळाडू : युद्धजित गुहा, लक्ष्मण, बी. के. किशोर, अलंकृत रापोळे आणि अर्णव बुग्गा.**

# लखनौ सुपरचे भरत अरुण नवे गोलंदाजी प्रशिक्षक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या हंगामापूर्वी लखनौ सुपर जायंटस् संघात मोठ्या बदलांचे वारे वाहू लागले आहेत. भारतीय संघाचे माजी गोलंदाजी प्रशिक्षक भरत अरुण हे लखनौ संघाचे नवे गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून सूत्रे स्वीकारणार आहेत. या नियुक्तीमुळे त्यांचा कोलकाता नाईट रायडर्स सोबतचा चार वर्षांचा यशस्वी प्रवास संपुष्टात आला आहे. यासोबतच, फिरकी गोलंदाजी मजबूत करण्यासाठी लखनौ संघाने इंग्लंडचे प्रसिद्ध प्रशिक्षक कार्ल क्रो यांनाही संघात आणण्याची तयारी केली आहे. कार्ल क्रो यांनी केकेआरसाठी सुनील नरेन आणि वरुण चक्रवर्ती यांसारख्या फिरकीपटूंच्या शैलीत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे या गोलंदाजांच्या कामगिरीत कमालीची सुधारणा झाली होती. लवकरच लखनौ फ्रँचायझीकडून याबाबत अधिकृत घोषणा अपेक्षित आहे.भरत अरुण यांची ओळख केवळ एक प्रशिक्षक म्हणून नाही, तर युवा वेगवान गोलंदाजांना शोधून त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर घडवणारे मार्गदर्शक म्हणून आहे. लखनौ संघात त्यांची भूमिका केवळ गोलंदाजी प्रशिक्षणापुरती मर्यादित राहणार नाही, तर वर्षभर युवा गोलंदाजांची निवड करणे आणि त्यांच्या प्रगतीवर देखरेख ठेवण्याची अतिरिक्त जबाबदारीही त्यांच्यावर असणार आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)